केडगाव, अहमदनगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
SHIVAM PROPERTIES शिवम प्रॉपर्टीज
संपर्क - 9822116347, 9881620700

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर. (0241) 2343896/2341196

Volume - 73 | Issue- 141 | Marathi Daily | Monday 3/2/2025 | Pages - 6 | Price- Rs. 3

अग्रलेख: करसवलतही, खर्चाचे आमिषही...! पान २



'समर्थ'मध्ये सूर्यनमस्कार स्पर्धा उत्साहात पान ७



श्रीकृष्ण तांडवच्या पठणाने दुमदुमली त्रिपुनीथुरा नगरी पान ८

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे




अर्थमंत्र्यांनी बारा लाखांच्या आतल्यांचा टॅक्स रद्द केल्याची बातमी आमच्या 'होम मिनिस्टरला' कळलेली आहे. ....त्या वाचलेल्या रकमेतून तिने साड्या व दागिने घेण्याचे ठरवले आहे!

## नगरला आणखी ५० कोटींचा निधी– पवार

# पृथ्वीराज मोहोळ महाराष्ट्र केसरीचा मानकरी

**समाचार/नगर-दि.३**

६७ व्या राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरी किताबासाठी झालेल्या लढतीत पुण्याच्या पृथ्वीराज मोहोळने सोलापूरच्या महेंद्र गायकवाडचा पराभव करीत विजतेपद पटकाविले. स्पर्धेचा विजेता पृथ्वीराज मोहोळ याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मानाची गदा आणि आ. संग्राम जगताप यांच्या वतीने देण्यात आलेली थार गाडी प्रदान करण्यात आली.

राज्यातील क्रीडा विकासाला चालना देताना प्रत्येक खेळासाठी आवश्यक आर्थिक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही पवार यांनी दिली. मॅट विभागात नांदेडचा (मूळचा पुण्याच्या राजगुरुनगरमधील राक्षेवाडीचा) डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे आणि पुणे जिल्ह्याचा पृथ्वीराज मोहोळ यांच्यात लढत झाली. यात पृथ्वीराज मोहोळ विजेता ठरला. माती विभागातून सोलापूर जिल्ह्याचा महेंद्र गायकवाड आणि परभणीचा साकेत यादव यांच्यात अंतिम लढत झाली. यात महेंद्र गायकवाड विजेता ठरला.येथील वाडिया पार्कमध्ये कै.बलभीमअण्णा जगताप क्रीडानगरीत झालेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार संग्राम जगताप, पद्मश्री पोपटराव पवार, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, माजी आमदार अरुण जगताप, माऊली खटके, काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त यशवंत डांगे उपस्थित होते.



(छाया– सिद्धार्थ दीक्षित)

पवार म्हणाले, खेळांना प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य शासनदेखील प्रयत्नशील आहे. प्रत्येक खेळाच्या विकासासाठी राज्य शासन सहकार्य करेल आणि नगरच्या क्रीडा विकासासाठीदेखील आवश्यक सहकार्य करण्यात येईल. मोहोळ म्हणाले, ही मानाची स्पर्धा आहे. स्व.मामासाहेब मोहोळ यांनी या स्पर्धेला सुरूवात केली. त्यानंतर राज्यात कुस्तीच्या वैभवात भर पडून ही परंपरा आणखी पुढे जात आहे. महाराष्ट्र कुस्तीची पंढरी आहे. राज्याने देशाला अनेक मल्ल दिले. महाराष्ट्राच्या तीन मल्लांना शासनाने वर्ग एक दर्जाच्या पदावर नियुक्ती दिली आहे. येत्या काळातही कुस्तीला राजाश्रय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. सभापती प्रा.शिंदे यांनी जिल्ह्यात महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल राज्य शासन आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाला धन्यवाद दिले. कुस्तीप्रेमी जनता चांगल्या खेळालाच प्रोत्साहन देते असे सांगून त्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. विखे म्हणाले, महाराष्ट्र केसरी स्पर्धा नगर वासियांसाठी मोठी पर्वणी आहे. वाडिया पार्कचे मोठ्या स्टेडिअममध्ये रुपांतर करायचे आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या क्रीडा विकासाला चालना मिळेल. आ. जगताप यांनी कुस्ती स्पर्धे विषयी माहिती दिली. लाल मातीच्या खेळातून संस्कार होत असल्याने राज्यभरात या खेळाचे संवर्धन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या कुस्ती स्पर्धेमुळे नगरचे नाव प्राधान्याने घेतले जाईल, असे ते म्हणाले.

## शिवराज राक्षेच्या आईचा सवाल

# पंचांवर कारवाई का नाही?

माझ्या मुलावर जर निलंबनाची कारवाई केली तर मग पंचांवर कारवाई का नाही? पंचांना शिक्षा का केली जात नाही? आमचा मुलगा गरीब घरातील आहे. पंचांनी रिप्ले का दाखवला नाही? चूकही मान्य केली पण ती नंतर मान्य केली. माझ्या मुलाचे इतकेच म्हणणे होते की रिप्ले दाखवा. तो दाखवला नाही. पंचांनी शिवीगाळ करणे किती बरोबर आहे? तीन वर्षे जर त्याचे निलंबन केले आहे तर मग पंचावर कारवाई केली पाहिजे, त्यांचीही चूक आहेच. मागच्या वर्षीही शिवराज राक्षेवर अन्यायच करण्यात आला. हे नेहमी घडत आले आहे, असे शिवराज राक्षेच्या आईने म्हटले आहे. शिवराज राक्षेने याआधी दोन वेळा महाराष्ट्र केसरीची गदा पटकावली. आपण तिसऱ्यांदा महाराष्ट्र केसरी होऊ नये, यासाठी जाणूनबुजून आपल्याविरोधात निर्णय दिल्याचा आरोप राक्षेने केला होता.

## शिवराज राक्षे, महेंद्र गायकवाडवर तीन वर्षांसाठी बंदी

महाराष्ट्र केसरी स्पर्धेत पंचांसोबत हुज्जत घालणे दोन पैलवानांना चांगलेच महागात पडले आहे. महेंद्र गायकवाड आणि शिवराज राक्षे यांच्यावर कुस्ती परिषदेकडून कारवाई करण्यात आली आहे. शिवराज राक्षे आणि महेंद्र गायकवाड यांना पंचासोबत वाद घालणे भोवले आहे. दोघांनाही तीन वर्षांसाठी निलंबित करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष रामदास तडस यांनी दिली. शिवराज राक्षेने पंचांचा निर्णय पटला नाही म्हणून त्यांच्यासोबत हुज्जत घातली होती. पंचांची कॉलर पकडून त्यांना लाथ देखील मारली. हेच कृत्य शिवराज राक्षेला महागात पडले. महाराष्ट्र केसरी कुस्ती किताबाच्या स्पर्धेत महत्त्वाच्या सामन्यांमध्ये मोठा गोंधळ पाहायला मिळाला. उपांत्य सामन्यात पैलवान शिवराज राक्षेने पंचांना लाथ मारली. यानंतर अंतिम सामन्यात पैलवान महेंद्र गायकवाड याने पंचांच्या निर्णयाविरोधात नाराजी व्यक्त केली आणि मैदान सोडले. त्यामुळे महाराष्ट्र कुस्ती परिषदेने दोघांवरही कठोर कारवाई केली आहे. राज्य कुस्तीगीर परिषदेने बैठक घेऊन दोन्ही पैलवानांवर तीन वर्षांची बंदी घातली आहे.

## निवडक

### मुंडे, कराड भेटीविषयी जरांगेंचा गौप्यस्फोट



**बीड, दि.३–** विधानसभा निवडणुकीच्या आधी धनंजय मुंडे यांच्याकडून मला ७ ते ८ दिवस भेटीसाठी निरोप येत होता. माझ्याकडे गर्दी असल्याने दोन–तीन वेळा ते अर्ध्या वाटेतून माघारीही गेले होते. त्यानंतर एक दिवस ते रात्री दोन वाजता अंतरवालीला आले. त्यावेळी मी सर्व लोकांना भेटून झोपलो होतो. मात्र एक–दोन तास झाले तरी ते काही तिथून गेले नाहीत. आमच्या लोकांनी मला सांगितले की तुम्हाला भेटल्याशिवाय जाणार नाही, असे धनंजय मुंडेंकडून सांगण्यात आले त्यावेळी वाल्मीक कराडही त्यांच्यासोबत होता, अशी माहिती जरांगे यांनी दिली.

## दोन कर्मचाऱ्यांचा खून; एक जण अत्यवस्थ

# हत्याकांडाने शिर्डी हादरली

**समाचार/नगर-दि.३**



शिर्डीत आज पहाटे झालेल्या भीषण हत्याकांडात साईबाबा संस्थानच्या दोन कर्मचाऱ्यांचा बळी गेला तर अत्यवस्थ असलेल्या एका ग्रामस्थावर प्रवरानगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेतील मयत झालेले सुभाष घोडे हे मंदिरातील कर्मचारी ड्युटीवर येत होते, तर नितीन शेजुळ हे सुरक्षा कर्मचारी ड्युटी संपवून घरी निघाले होते. कृष्णा देहरकर हे मुलाला सोडून घरी निघाले होते. त्यांच्यावरही प्राणघातक हल्ला झाला. पहाटे चार ते साडेपाच दरम्यान विमानतळ रोडला विविध ठिकाणी या घटना घडल्या.

मोटार सायकलवर असलेल्या दोघांनी चोरीच्या उद्देशाने या तिघांना अडवून त्यांच्याकडील रक्कम हिसकावून घेतली. इतक्यावरच न थांबता आरोपींनी या तिघांवर चाकूने असंख्य वार केले. यात दोघांचा जागेवरच मृत्यू झाला. सीसीटीव्हीमध्ये ही घटना कैद झाली आहे. पोलिसांनी अपघात असल्याचे सांगून घटना गांभीर्याने न (पान ३ वर)

# महाकुंभ मेळ्यातील भाविकांच्या मदतीसाठी नियंत्रण कक्ष

**समाचार/नगर-दि.३**

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यात गेलेल्या भाविकांच्या मदतीसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे. महाकुंभमेळ्यासाठी गेलेले भाविक त्याठिकाणी अडकून पडल्यास किंवा त्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी तालुकास्तरावर संबंधीत तहसिलदार यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. भाविकांनी मदतीसाठी जिल्हा नियंत्रण कक्षाशी ०२४१–२३२३८४४, २३५६९४० या दूरध्वनी क्रमांकावर किंवा १०७७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.




## १५ फेब्रुवारीनंतर जप्तीची मोहीम

# १०० टक्के शास्ती माफीसाठी मुदतवाढ

**समाचार/नगर-दि.३**

महापालिकेने मालमत्ता कर व पाणीपट्टीची वसुली वाढवण्यासाठी मालमत्ता करावरील शास्तीमध्ये सवलत जाहीर केली आहे. त्यानुसार जानेवारी अखेर १०० टक्के शास्ती माफ करण्यात आली होती. यात ८ हजार ८४५ मालमत्ता धारकांनी सवलतीचा लाभ घेतला. आता नागरिकांच्या मागणीनुसार १५ फेब्रुवारीपर्यंत शास्तीमध्ये १०० टक्के सवलत जाहीर करण्यात आली आहे. १५ दिवस मुदत वाढवून देण्यात आली असून, थकबाकीदार नागरिकांनी सवलतीचा लाभ घेऊन कराचा भरणा करावा व जप्तीची कटू कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

महापालिकेने ८ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत १०० टक्के शास्तीमध्ये सवलत दिली होती. तर फेब्रुवारी महिन्यात ७५ टक्के सवलत दिली होती. जानेवारी महिन्यात ८ हजार ८४५ थकबाकीदारांनी सवलतीचा लाभ घेऊन कराचा भरणा केला. मात्र, नागरिकांकडून १०० टक्के शास्ती माफीसाठी मुदत वाढवून देण्याची मागणी सातत्याने होत होती. त्याचा विचार करून आता १५ फेब्रुवारी पर्यंत १०० टक्के शास्ती माफीची मुदत वाढवून देण्यात आली आहे. थकबाकीदारांनी या १०० टक्के सवलत योजनेचा लाभ घेऊन तत्काळ कराचा भरणा करावा. महापालिका प्रशासनाने सर्व प्रभाग समिती कार्यालय अंतर्गत थकबाकीदारांना नोटिसा बजावण्यास सुरुवात केली आहे. जप्ती कारवाई सुरू असून, १५ फेब्रुवारीनंतर ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार आहे. त्यामुळे जप्तीची कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदार मालमत्ता धारकांनी सवलतीचा लाभ घेऊन तत्काळ कराचा भरणा करावा, असे आवाहन डांगे यांनी केले आहे.

# पुणे-नागपूर वंदे भारतला नगरमध्ये थांबा नाहीच!

**समाचार/नगर-दि.३**

नागपूरला आणखी दोन वंदे भारत रेल्वे मिळण्याची शक्यता आहे. नागपूर ते पुणे आणि नागपूर ते मुंबई या मार्गावर वंदे भारत रेल्वे धावणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर–पुणे वंदे भारत स्लीपर रेल्वे लवकरच धावण्याची शक्यता आहे. रेल्वेच्या नागपूर विभागाने वंदे भारत एक्सप्रेससाठी भारतीय रेल्वे बोर्डाकडे प्रस्ताव पाठवला. नागपूर–पुणे आणि नागपूर–मुंबई यामार्गावर स्लीपर वंदे भारत मिळावी म्हणून हा प्रस्ताव पाठवल्याचे समोर आले.

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील अधिकारी (डीआरएम) विनायक गर्ग यांनी नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेत वंदे भारत रेल्वे विषयी दुजोरा दिला. विनायक गर्ग यांनी रेल्वे नेटवर्कमध्ये नागपूरचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित केले होते. ते म्हणाले, नागपूर विभाग प्रवाशांच्या रेल्वेच्या नेटवर्क वाढीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. जवळपास १२५ हून अधिक गाड्या नागपूर स्थानकातून धावतात. लवकरच नागपूरवरून वंदे भारत स्लीपर ट्रेनही धावण्याची शक्यता आहे. नागपूर–पुणे आणि नागपूर–मुंबई या मार्गावर रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहेत. प्रवाशी जास्त आणि रेल्वे कमी आहेत, त्यामुळे वंदे भारत ट्रेन आल्यास मोठा फायदा होऊ शकतो. नागपूर–पुणे या मार्गावर मर्यादीत रेल्वे असल्यामुळे अनेकजण रस्ते मार्गाने प्रवास करतात. जर आरामदायी वंदे भारत रेल्वे सुरू झाल्यास प्रवाशांचा कल याकडे जास्त राहण्याची शक्यता आहे. त्याशिवाय वेळेची बचत होणार आहे. दरम्यान, नागपूर ते पुणे यादरम्यान धावणारी स्लीपर वंदे भारत वर्धा, धामणगाव, अकोला, शेगाव, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, दौंड या स्टेशनवर थांबण्याची शक्यता आहे. दरम्यान, अद्याप नागपूर–पुणे वंदे भारत ट्रेनच्या तिकिटासंदर्भात अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मर्यादीत रेल्वे असल्यामुळे प्रवाशांना तिकिट मिळत नाहीत. त्यामुळे ते रस्ते मार्गाने प्रवास करतात. वंदे भारत एक्सप्रेस सुरू झाल्यास वेळ आणि पैसे दोन्ही वाचेल. वंदे भारत एक्सप्रेस इतर रेल्वेच्या तुलनेत वेगवान आणि आरामदायी आहे. त्यामुळे प्रवाशांना फायदा होईल.




शिखर संस्थेवर स्थान
राष्ट्रीय स्तरावरील बहुमान
तुमच्या निवडीचा
आम्हां अभिमान...



वसंत पंचमीच्या शुभदिनी सृष्टी
नवचैतन्याने बहरणं प्रारंभ करते.
या शुभदिनी पतसंस्थेचे संस्थापक व अध्यक्ष
मा.श्री. वसंतजी लोढा
यांची जैनीयांच्या देशपातळीवरील सर्वोच्च,
शिखर अशा श्री ऑल इंडिया
श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स,
नवी दिल्ली या संस्थेच्या राष्ट्रीय मंत्रीपदी
निवड झाली. आपल्या कार्यकर्तृत्वाचा
आम्हाला अभिमान आहे.
उत्तरोत्तर कार्यकर्तृत्वासाठी शुभेच्छा...!




मिलींद गंधे – जेष्ठ संचालक | विकास पाथरकर – मानद सचिव | सुधीर पगारिया – उपाध्यक्ष
निलेश लोढा । शैलेश चंदे । श्रीमती शैला चंगेडे
सौ. शारदा हौसिंग । बाबासाहेब साठे । सुभाष फणसे

आदर्श पतसंस्था पुरस्कार प्राप्त शहरातील एक विश्वसनीय पतसंस्था
पंडीत दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहमदनगर
मुख्य कार्यालय : आनंदी बाजार, पटवर्धन चौक, अ.नगर. फोन : २३४५४४६
● सावेडी : फोन : २४२४७९७
Dishan

संपादकीय

# करसवलतही, खर्चाचे आमिषही...!

कोणत्याही तडजोडीशिवाय किंवा निवडणुकीच्या दबावाखाली न जाता अर्थमंत्र्यांनी देशाचा अर्थसंकल्प सादर केला आणि देशभरात नानाविध पडसाद उमटले. लोकांच्या अमर्याद आशा-अपेक्षांना हा अर्थसंकल्प पुरा पडतो की नाही हे दिसेलच, मात्र हा अर्थसंकल्प वाईट नाही, एवढे नक्की सांगता येते. गेल्या दहा वर्षांमध्ये मध्यमवर्गाचे उत्पन्न वाढत होते; परंतु वाढणारे उत्पन्न प्राप्तिकरात जात होते. त्यामुळे हा वर्ग काहीसा नाराज झाला होता. लवकरच दिल्ली आणि नंतर बिहार विधानसभेची निवडणूक आहे. त्यामुळे आपल्या पाठीराख्या मध्यमवर्गाला एकीकडे खूश करायचे आणि त्याला त्याच्या आवडीच्या गोष्टीत मोठ्या प्रमाणात खर्च करायला लावायचा, ही नीती अर्थसंकल्पात वापरण्यात आली आहे. मोठया प्रमाणात खर्च करणारा हाच घटक देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात हातभार लावत असतो. इतर घटकांपेक्षा या घटकांच्या हातून होणारी उलाढाल मोठी असते. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबरच करातून वाचणारा पैसा बाजारात कसा येईल, याची तजवीज करण्यात आली. त्यासाठी ईव्ही वाहने, मोबाईल, टीव्हीचे सुटे भाग स्वस्त करताना मोठे टीव्ही मात्र महाग करून ठेवले. पूर्वीच्या तीन लाख रुपयांच्या करमुक्त मर्यादेच्या तुलनेत आता चार लाखांचे उत्पन्न करमुक्त असेल. त्याव्यतिरिक्त गृहकर्ज, मेडिक्लेम, ठराविक गुंतवणुकीवर १२ लाखांपर्यंतच्या कमाईवर नोकरदारांना छदामही भरावा लागणार नाही. पुढे जो काही कर द्यावा लागेल, तो सवलत, सुटीच्या माध्यमातून पुन्हा वसूल करता येईल. एकंदरीत, पूर्वी सात लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होते. ते आता १२ लाख रुपयांपर्यंत झाले आहे. प्रमाणित वजावटी विचारात घेऊन ही सवलत असेल. तज्ज्ञांच्या मते वाचलेला हा पैसा पुन्हा बाजारात फिरेल, तो बँकेत गुंतवला जाईल अथवा नोकरदार वर्ग ही बचत बाजारात खर्च करेल. त्यामुळे सुस्तावलेल्या अर्थव्यवस्थेला गती मिळेल आणि विकसित भारतासाठी मोठा वृद्धीदर गाठणे सोपे होईल. केंद्र सरकारने एक दोन नव्हे तर, गंभीर आजारावरील ३६ औषधे करमुक्त केली आहेत. त्यामुळे ही औषधे स्वस्तात मिळणार आहेत. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये कॅन्सर डे केअर सेंटर बनवण्याचा निर्णयही केंद्र सरकारने घेतला आहे. कॅन्सरवरील उपचारासाठीची औषधे आता स्वस्त होणार आहेत. सहा जीवनरक्षक औषधांवरील सीमा शुल्क पाच टक्के करण्यात आले आहे. अर्थसंकल्पातून विमा क्षेत्रासाठी काही चांगल्या तरतुदी समोर आल्या. अर्थमंत्र्यांनी देशातील विमा क्षेत्रातील गुंतवणूक परकीय गुंतवणूकदारांसाठी खुली करताना ही रक्कम भारतातच वापरण्याचे बंधन घातले आहे. त्यामुळे आरोग्य विमा क्षेत्रात स्पर्धा होणार असली, तरी आरोग्य विमा जीएसटीमुक्त करण्याची मागणी मात्र विचारात घेतली गेली नाही. या सरकारने कृषीसह सर्वच क्षेत्रांमध्ये 'एआय' तंत्रज्ञान वापरण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या जागा कमी असल्यामुळे विद्यार्थी या शिक्षणापासून वंचित राहतात. आर्थिक स्थिती चांगली असलेली मुले खासगी मेडिकल कॉलेजमध्ये शिकतात; मात्र गरीब कुटुंबातून आलेली मुले वेगळ्या क्षेत्रात जातात. आता सीतारामन यांनी मोठा दिलासा दिला आहे. त्यांनी येत्या पाच वर्षांमध्ये वैद्यकीयच्या दहा हजार जागा वाढवणार असल्याची घोषणा केली आहे. विद्यार्थ्यांसाठी ही मोठी गोष्ट ठरणार आहे. या विद्यार्थ्यांना सरकारी वैद्यकीय कॉलेजमध्ये शिक्षण मिळणार आहे. सरकार दहा हजार कोटी रुपयाचे योगदान देऊन 'स्टार्ट अप्स'साठी फंडची व्यवस्था करणार आहे. सरकार पहिल्यांदा पाच लाख महिला, एससी आणि एसटी उद्योजिका घडवण्यासाठी दोन कोटी रुपये कर्ज देईल. महिलांना सहज अटींवर विनातारण कर्ज मिळेल. त्यामुळे त्यांना छोट्या आणि मध्यम आकाराचा व्यवसाय सुरू करता येईल. महिलांना उद्योग वाढवण्यासाठी डिजिटल ट्रेनिंग, मार्केटिंग सपोर्ट आणि सरकारी योजनांशी जोडण्याची संधी दिली जाईल. सीतारामन यांनी बजेट मांडताना शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा केली. यात शेतकरी क्रेडिट कार्डची मर्यादा दोन लाखांनी वाढवली. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकाराचे दरवाजे ठोठावण्याची गरज भासणार नाही. युरिया उत्पादनात आत्मनिर्भरता वाढवण्यासाठी सरकार बंद पडलेले तीन युरिया प्लांट पुन्हा सुरू करणार आहे. युरिया पुरवठा वाढवण्यासाठी आसामच्या नामरुप येथे १२.७ लाख मॅट्रिक टन वार्षिक क्षमतेचा प्लांट लावला जाईल. त्यामुळे युरियाची आयात कमी होईल; परंतु गेल्या वर्षभरात खतांच्या अनुदानात केलेली कपात आणि त्यामुळे महाग झालेल्या खतांवर उपाय सापडत नाही. कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाला चालना देण्यासाठी मात्र अर्थसंकल्पात तरतूद नाही. डाळ आणि कापसासाठी धोरण जाहीर केले असले, तरी पूर्वीचा अनुभव लक्षात घेता शेतकरी या धोरणाला किती प्रतिसाद देतात, याबाबत साशंकता आहे. सरकारतर्फे धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. सरकारच्या कररचना आणि गुंतवणुकीबाबतच्या धोरणावर भांडवली बाजाराने नकारात्मक प्रतिक्रिया नोंदवली. देशात बचतीचे प्रमाण आधीच कमी होत असताना करबचतीचा पैसा गुंतवणुकीकडे वळवता आला असता; परंतु सरकारने त्या दिशेने फारसे प्रयत्न केल्याचे दिसले नाही. सीतारामन यांनी भाषणामध्ये नवीन प्राप्तिकर कायद्याचा ओझरता उल्लेख केला. सरकार याविषयीचे विधेयक सादर करणार आहे. त्यानंतर करदाते आणि तज्ज्ञांच्या हरकती, प्रतिक्रियेनंतर त्यात सुधारणा करण्यात येईल. प्राप्तिकर कायद्याचे सुधारीत स्वरुप हे अत्यंत सोपे आणि सुटसुटीत असेल. हे विधेयक व्यक्ती, संस्था, उद्योग आणि सरकारला विविध न्यायालयीन कचाट्यातून बाहेर काढण्याचे काम करेल. त्यापोटी नाहक खटले दाखल करण्याची वेळ येऊ नये यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर आर्थिक संकल्प चांगला आहे, मात्र त्यात काही अभिनव पावले दिसली नाहीत, असे वाटते.

# पोस्टर, मॉडेल स्पर्धेत 'आडसूळ' प्रथम

**समाचार/नगर-दि.३**

चास येथील साकेश्वर ग्रामीण विकास सेवासंस्थेच्या आडसूळ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींनी मॅथेमॅटिकल पोस्टर्स व मॉडेल स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

सन २०११ साली अनिरुद्ध आडसूळ यांनी महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेचे तांत्रिक शिक्षण मिळावे या उद्देशाने साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थे अंतर्गत आडसूळ अभियांत्रिकी महाविद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली. या अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. अहिल्यानगर येथील न्यू आर्टस कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात पार पडलेल्या मॅथेमॅटिकल पोस्टर अॅण्ड मॉडेल स्पर्धेमध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत प्रथम वर्षातील विद्यार्थीनी शिंदे यशश्री, विधाते प्राजक्ता व झिने संस्कृती यांच्या संघाला प्रथम पारितोषिक मिळाले. सहभागी व विजेत्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीचे प्रथम वर्ष विभागप्रमुख प्रा. घुले ए. पी., डॉ.हेमंत जाधव, डॉ.अडावकर डी.यु., डॉ.खान एस.वाय., डॉ.कांबळे व्ही.व्ही., प्रा.डौले ए.डी., प्रा. जवरे ए.आर. व सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी प्राध्यापिका सुवर्णा झरेकर यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध माणिक आडसूळ, सचिव लीना आडसूळ, डायरेक्टर कृष्णा आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य व डायरेक्टर डॉ. पी. एम. पाटील, प्राचार्य. डॉ. संभाजी पठारे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य गडाख आर. एस. आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार साधना कुकडे यांना प्रदान




**समाचार/नगर-दि.३**

छत्रपती संभाजीनगर येथील ब्राह्मण महिला मंचच्या वतीने अहिल्यानगर येथील समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या आनंदवनभुवन पूर्व प्राथमिक बालवाडी विभागाच्या शिक्षिका साधना प्रसाद कुकडे-कुलकर्णी यांना (महाराष्ट्रातून) राज्य स्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर येथील आयोजित कार्यक्रमात उपमहापौर संजय जोशी, अमृत विकासाचे अध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, अमृत विकास सल्लागार विश्वजित देशपांडे, (सामाजिक कार्यकर्त्या अमृता पालोदकर, ब्राह्मण महिला मंचच्या अध्यक्षा विजयाताई कुलकर्णी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काचे स्वरूप सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे आहे.

# 'मनामनातले'

नमस्कार! !

सुजाण वाचकहो,

या सदराचे नाव आहे 'मनामनातले' प्रत्येकाच्या आयुष्यातील अविभाज्य घटक असलेल्या तरी देखील जरा दुर्लक्षित अशा मनाच्या अदृश्य प्रदेशात डोकावण्याचा प्रयत्न करूया. मनाची संकल्पना बऱ्याच कवी, संत, तज्ज्ञ यांनी वेगवेगळ्या प्रकाराने मांडण्याचा आपापल्यापरीने प्रयत्न केलाय, आपल्याला माहीत आहेच. मन हे प्रत्येकाला वेगवेगळ्या तऱ्हेने उलगडले आहे, असे मात्र जाणवते. त्याचे एकमेव कारण म्हणजे बाकी अवयवाप्रमाणे 'मन' डोळ्याला दिसत नाही, परंतु एकही जण मनाचे अस्तित्व नाकारू शकत नाही. असे हे अदृश्य मन समस्त मनुष्यप्राण्याच्या जीवनावर अधिराज्य गाजवताना आपण अनुभवतो. दैनंदिन जीवनात रोजच 'मन' हा शब्द आपण वारंवार वापरत असतो, जसे - मनात काही तरी असणे /नसणे, मनावर घेणे /न घेणे, मनात रुंजी घालणे, मोठ्या मनाचा असणे /नसणे इ.

अशा या न दिसणाऱ्या, ११ वे इंद्रिय मानल्या जाणाऱ्या मनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे कर्मकठीणच! आपण बघतोच या प्रगतशील युगामध्ये अनंत प्रकारच्या तपासण्या आल्या आहेत, त्यामुळे आजाराचे निदान करणे हे तज्ज्ञांना पूर्वीच्या काळापेक्षा सोपे झाले आहे यात शंका नाही.परंतु मनाच्या आजाराचे, मनाच्या भावविश्वाचे निदान करण्यासाठी एकही तपासणी नाही. मनाच्या आजाराचे नेमके निदान करण्यासाठी वेगळ्याप्रकारचे कौशल्य लागते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यातून आमच्यासारख्या तज्ज्ञांना शिक्षण आणि अनुभवाद्वारे समोरचा चेहेरा बघून आणि थोडा जुजबी संवाद साधून साधारणपणे समोरच्याची स्वभाववैशिष्ट्ये लक्षात येऊ शकतात. या बाबतीत समज खूपच अनभिज्ञ असतो कारण कुठलाही आजाराचे निदान म्हणजे तपासण्या हे गणित समाजाच्याअंगावळणी पडले आहे. तपासण्या/investigatons मध्ये गैर काहीच नाही. खरे बघितले तर तपासण्यांशिवाय आपले आयुष्य हे कल्पनेच्या बाहेर आहे. उदा - CT scan, MRI, विविध प्रकारच्या तपासण्या हे मानवी जीवनाला मिळालेले वरदानच म्हणावे लागेल, यात तिळमात्र शंका नाही. या सगळयामुळे तर आपण विविध गंभीर आजारांपासून वाचू शकत आहोत. मुद्दा असा आहे की, मानसिक आजाराला tests नाहीत म्हणून आमचे एक मानसशास्त्रज्ञ (clinical psychologist) आणि मानसोपचार तज्ज्ञ ( psychiatrist) म्हणून काम हे खूप आव्हानात्मक आहे असेच म्हणावे लागेल.

मनाचा नक्की ठावठिकाणा माहीत नसल्याकारणाने तसेच मन दिसत नसल्याने कुठल्याही प्रकारच्या तपासण्या/investigative tool मनाच्या आजारासाठी, अस्वास्थ्यासाठी येणे हे अशक्य वाटत आहे. आजकालच्या AI च्या जमान्यामध्ये अशी चर्चा किंवा भाकीत केले जात आहे की मनातील भाव भावना AI च्या मदतीने शक्य होईल.

मानसिक आरोग्यावर विविध पद्धतीने ऊहापोह कारण्याच्या हेतूने हे सदर सुरु करत आहोत!

मन हे प्रत्येकालाच असते त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील मंडळी सर्रास मनावर वारंवार बोलताना, लिहिताना आपण बघतो.परंतु ज्याप्रमाणे इतर क्षेत्रे अभ्यास करून, अनुभवाने अवगत केली जातात तसेच मानसिक स्वास्थ्यावर काम करणारे तज्ज्ञ लोक त्याच पद्धतीने काम करत असतात.

' मनामनातले' हे सदर म्हणजे मानसशास्त्र (psycholog), आणि मनोविकार शास्त्र (Psychiatry), उपचारपद्धती, psychiatrist आणि psychologist यांची नेमकी भूमिका, समाजाची जबाबदारी अशा अनेक विषयांवर जनजागृती करण्याचा प्रयत्न असणार आहे. २००७ साली 'मनोवेध' नावाने आम्ही सदर प्रकाशित करत होतो परंतु गेल्या १२ ते १५ वर्षांमध्ये समाजामध्ये झालेला बदल लक्षात घेऊन आग्रहस्तव परत तुमच्या भेटीस येताना आम्हाला आनंद होत आहे.

लवकरच भेटूया पुढील भागात!!

**-दीप्ती नीरज करंदीकर**
(क्लिनिकलसायकोलॉजिस्ट)




### राशीभविष्य

- **मेष** : ज्ञानप्राप्तीबाबत अनुकूलता राहील. उत्पन्नाचे नवे मार्ग सापडतील. गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत.
- **वृषभ** : इच्छित प्राप्तीत बऱ्यापैकी यश मिळेल. वाद-विवादापासून दूर रहायला हवं. ताण-तणाव दूर होतील.
- **मिथुन** : आर्थिक बाबतीत तडजोडीचं धोरण ठेवावं. मुलांबाबत चिंता राहील. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **कर्क** : महत्त्वाच्या कामांसाठी पाठपुरावा करावा लागेल. जुनी येणी पुन्हा रखडतील. प्रकृतीची काळजी घ्या.
- **सिंह** : महत्त्वाचे निर्णय विचारपूर्वक घ्यावेत. व्यवसायात प्राप्तीचं प्रमाण साधारण राहील. विचारानं रहावं.
- **कन्या** : महत्त्वाचे करार मार्गी लागतील. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. पर्यटनाला वाव मिळेल.
- **तूळ** : सरकारी कामं मनाजोगी होतील. नव्या इच्छा-आकांक्षांना वाव मिळेल. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **वृश्चिक** : कौटुंबिक बाबतीत विचारानं रहावं. व्यवहारात मध्यस्थी करू नये. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात.
- **धनु** : भागीदारी व्यवसायात उत्कर्षाच्या संधी लाभतील. विद्यार्थ्यांची विद्याभ्यासात प्रगती होईल. चिंता नको.
- **मकर** : रखडलेली कामं आज करून घ्यावी. अपेक्षित वार्ता प्राप्त होईल. खर्च वाढला तरी प्राप्तीही वाढेल.
- **कुंभ** : दिलासादायक घटना घडतील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. घरगुती प्रश्नांबाबत समाधान लाभेल.
- **मीन** : चैनीवर अधिक खर्च होईल. मित्रमंडळीत व्यवहार शक्यतो टाळावे. यंत्राचा वापर जपून करावा.

### ४ फेब्रुवारी


दिनविशेष

- **२०१३** : कावेरी पाणीवाटप प्रकरणात तमिळनाडूसाठी कर्नाटक सरकारने दोन टीएमसी पाणी सोडण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश.
- **२०१४** : भारतीय वंशाच्या ४५ वर्षीय सत्या नदेला यांची मायक्रोसॉफ्टच्या सीईओपदी नियुक्ती झाल्याची अधिकृत घोषणा.
- **२०१६** : मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक्स माध्यम क्षेत्रातील मुक्त पत्रकारांना निवृत्तीवेतन लागू करण्याच्या उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचना.
- **२०१८** : पश्चिम आफ्रिकेच्या बेनिन किनारपट्टीवरून तेलवाहू जहाज बेपत्ता.

आरोग्यमंत्र

### यकृताच्या ट्युमरबाबत...

आजकाल आरोग्यविषयक समस्यांबाबत जागरूकता वाढत असल्याचं पहायला मिळत आहे. यात ट्युमर बाबतची काही महत्त्वपूर्ण माहिती दिली जाण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने आज 'हेपॅटिक हेमॅन्जिओमा'बाबत जाणून घेऊ...



यकृताच्या आतल्या भागातल्या किंवा वरच्या पृष्ठभागावरच्या रक्तवाहिन्या एकमेकांमध्ये गुंतून ट्यूमर निर्माण होण्याला 'हेपॅटिक हेमॅन्जिओमा' म्हणतात. या ट्यूमरचं रूपांतर कॅन्सरमध्ये होत नाही. तसंच याची फारशी लक्षणंही दिसून येत नाहीत. शरीरात या विकाराचं अस्तित्त्व असल्याचं रूग्णांच्या लक्षातही येत नाही. इतर काही कारणांनी यकृताची तपासणी केली तर याचं निदान होतं.

ओटीपोटात वेदना, मळमळणं, उलटी, भूक मंदावणं अशी याची साधारण लक्षणं आहेत. हा विकार असलेल्या रूग्णांमध्ये इतर कारणांमुळे ही लक्षणं दिसतात. त्यामुळे तपासणीअंतीच त्यामागचं मूळ कारण लक्षात येतं. 'हेपॅटिक हेमॅन्जिओमा'मुळे प्रौढांमध्ये गुंतागुंत निर्माण होत नाही. पण अर्भकांसाठी हा विकार धोकादायक ठरू शकतो. मूल सहा महिन्यांचं होण्याआधी याचं निदान होतं.'हेपॅटिक हेमॅन्जिओमा'मागील नेमक्या कारणाचा शोध लागला नसला तरी यामागे अनुवांशिक कारणं असल्याचं डॉक्टरांचं म्हणणं आहे. काही प्रकारचे हेपॅटिक हेमॅन्जिओमा जन्मजात असू शकतात. त्यामुळे कुटुंबात या विकाराचा इतिहास असेल तर त्याची तपासणी करावी. ३० ते ५० या वयोगटातल्या लोकांना या विकाराची शक्यता सर्वाधिक असते.

महत्त्वपूर्ण काही...

### पक्ष्यांच्या स्थलांतराचं तंत्र

दरवर्षी हिवाळ्यात विशिष्ट प्रकारचे पक्षी ठराविक ठिकाणी हजारोंच्या संख्येने जमत असल्याचं पहायला मिळतं. विशेष म्हणजे हे पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करून दूर देशातून आपल्याकडे येतात. इतकं अंतर पार करून हे पक्षी विशिष्ट ठिकाणी विशिष्ट वेळेत कसे उतरत असतील याचं साऱ्यांनाच कुतूहल वाटतं. नकाशा आणि होकायंत्र यांचा वापर करून नाविक भर समुद्रातून नौका चालवतात. हे पक्षी तशाच तंत्राचा वापर करतात असं संशोधकांचं म्हणणं आहे. स्थान शोधण्यासाठी हे पक्षी काही ठळक ठिकाणांचा म्हणजे लँडमार्कचा वापर करतात असंही दिसून आलं. त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणांची उंची आणि त्यांचं एकमेकांपासून असणारं अंतर यांचं भान पक्ष्यांना असतं. काहींच्या मते ते सूर्यप्रकाशाचा वापर करतात. डोळ्यांच्या खास रचनेमुळे सूर्यकिरणांची दिशा, निरनिराळ्या ठिकाणांशी त्यांचा होणारा कोन याचं भान पक्ष्यांना होतं. काहींच्या मते, या पक्ष्यांकडून पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राचा वापर होतो. त्यांच्या मस्तकातील खास मज्जातंतूंमध्ये चुंबकीय क्षेत्राला प्रतिसाद देण्याची क्षमता असते आणि त्याचा वापर करून ते आपली वाट शोधतात.

वाचा तर खरं

ड्रेसिंग टेबलमध्ये हेअरपिन, साडीपिन, ब्रोच, धातूच्या क्लिप्स अथवा यासारख्या अन्य अॅक्सेसरीजसाठी कितीही चांगली सोय केली तरी त्या इकडेतिकडे जातात आणि वेळेवर सापडत नाहीत. त्यामुळे अडचण होते आणि ताणही वाढतो. यावर उपाय म्हणजे टेबलमधील आतल्या बाजूला मॅग्नेटिक स्ट्रिप लावून घेणं. ही स्ट्रिप बाजारात मिळते. धातूच्या छोट्या-मोठ्या वस्तू या स्ट्रिपवर चिकटून राहतात आणि इतस्ततः विखुरण्याचा, गहाळ होण्याचा धोका रहात नाही. स्वयंपाकघरातही धातूच्या वस्तू सुरक्षीत ठेवण्यासाठी ही स्ट्रिप कामी येईल.

सल्ला मोलाचा

### गिफ्टिंग न्यूली वेड

लग्नाला जायचं म्हटल्यावर नवदांपत्याला काय भेट द्यावी हा पेच असतोच. नवदांपत्याला कोणती भेट घ्यावी याचा विचार आपण करायला लागतो तेव्हा डोकं अगदी भंडावून जातं. नवदांपत्याला भेट देण्यासाठी अशा गोष्टी निवडाव्यात ज्यांच्या वापराने त्यांचं काम सोपं होईल. दिलेली भेटवस्तू त्यांना आवडली तर आपला पैसा आणि त्यासाठी घेतलेले कष्ट हे दोन्ही सत्कारणी लागेल. भेटवस्तूंबाबत विचार करताना गारमेंट ऑर्गनायझर, अॅक्सेसरी ऑर्गनायझर, कपडे ठेवण्याची व्हॅक्यूम बॅग, शू रॅक, ड्रॉईंग स्टँड अशा गोष्टींचा विचार होत नाही. याचं कारण या उपयोगी वस्तूंना कधी महत्त्वच दिलं जात नाही. बाजारपेठेत या वस्तू पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. पण, भेटवस्तू म्हणून त्याला पसंती मिळत नाही. पण आपण उपयोगी वस्तूंचा विचार करुन खरेदी करु इच्छित असाल तर अशी स्टायलिश आणि अभिनव उत्पादनं आपल्या मदतीला येऊ शकतात. अशा वस्तू नवदांपत्यासाठी निश्चितच उपयोगी पडतील. आपली भेट संस्मरणीय व्हावी अशी इच्छा असेल तर हे पाळायलाच हवं.

पंचांग

**मंगळवार, ४ फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. ७, नक्षत्र : अश्विनी
चंद्रराशी : मेष, शुभ योग,
सूर्योदय : ७.१२, सूर्यास्त : ६.३३

फॉरवर्डस

विरहात चंद्राचा मंद प्रकाशही होरपळवततो. याचं कवीने केलेलं वर्णन लक्षात घ्यायला हवं.

**अब जलाता है रात भर मुझको,**
**अच्छा लगता था चाँद बचपन में...!**

फॅशन पॅशन

### विचार हटके स्टाईलचा

दोस्तांनो, या थंडीत काही फॅशन्सचा अवलंब करायचा राहिला असेल तर त्यासाठी काही दिवस संधी आहे.. खरं तर या दिवसात जॅकेट्स, स्वेटर्स, स्टोल्सची चलती असते. लेअरिंगचं तंत्र वापरावं लागतं. हे लक्षात घेऊन थंडीतल्या काही हटके स्टायलिंगचा विचार करता येईल.

✻ थंडीत तुमच्याकडे बेनी कॅप असायला हवी. कान झाकणाऱ्या या कॅपमुळे थंड वाऱ्याचा त्रास होणार नाही. पार्टीला असो किंवा जीम ही कॅप कुठेही घालता येण्यासारखी असते.

✻ मफलर्सच्या आकारावर जाऊ नका. ट्रेंडी मफलर्समुळे तुम्ही स्टायलिंगचं तंत्र जपू शकता. हा मफलरही व्हर्सटाईल आहे. तो कशावरही चालून जाईल.



✻ स्वेटर घालणं बोअरिंग वाटत असेल तर स्वेटशर्ट कॅरी करा. स्टायलिश, ट्रेंडी स्वेटशर्ट आणि जीन्स हे कॉम्बिनेशन हिट ठरेल.

✻ थंडीत पायांनाही जपायला हवं. मग चेल्सी बूटांची जोडी खरेदी करा. स्लीम फिट जीन्सपासून थ्री पीस सूटपर्यंत... हे बूट कशावरही छान दिसतील.

✻ स्लीम फिट जॅकेटही मस्ट हॅव आहे. फॉर्मल मिटिंग असो किंवा कॅज्युअल आउटिंग... हे जॅकेट कुठल्याही ऑकेजनची शान ठरतं.

खेचाखेची

### काय म्हणाल?

रमेश नेहमीच्या रस्त्याने जात असतो. तेवढ्यात हिसका बसतो. बघतो तो खिसेकापू खिसा कापत असतो. खिसेकापू पसार होण्याच्या बेतात असतानाच रमेश त्याला तत्परतेने पकडता खिसेकापूला पकडल्यावर रमेश विचारतो, 'काय रे खिसे कापतोस? लाज कशी नाही वाटत तुला?'
त्यावर खिसेकापू उत्तरतो, 'लाज तर तुम्हाला वाटायला हवी. एक रुपयाही नाही तुमच्या खिशात...'

वेगळे काही

घराच्या अथवा कार्यालयाच्या सुशोभीकरणासाठी काचेचा वापर केला जाणं अगदी स्वाभाविक आहे. सध्या हा ट्रेंड प्रचलित आहे. पण हे कोणाचं घरही नाही आणि कार्यालयही नाही. मग इथं अशा आकर्षक काचा का बरं लावल्या आहेत ? इथे वेगवेगळ्या जातीच्या वनस्पती पहायला मिळतातच पण त्याचबरोबर आकर्षक पद्धतीनं सजवलेल्या काचांचा अनोखा संग्रहही पहायला मिळतो. मॅक्सिकोमध्ये हे आगळंवेगळं संग्रहालय आहे. अतिशय भव्यदिव्य आकारातील या काचा जपणं हे ही काही सोपं काम नाही. शिवाय त्यावर केलेली सजावटही जपावी लागते.

### टिकवा केसांची चमक

सौंदर्यसाधना

केसांची समस्या ही महिलांसाठी मोठी चिंतेची बाब ठरते. त्यामुळे केसांच्या समस्यांवर वेळीच उपचार गरजेचे ठरतात. त्याच बरोबर केसांच्या योग्य देखभालीकडे लक्ष द्यायला हवं. यात केसांची चमक टिकवून ठेवण्याचा भाग महत्त्वाचा ठरतो. खरं तर यासाठी सोपा उपाय करता येण्यासारखा आहे. तो म्हणजे केसांना वाफ देणे. ही प्रक्रिया तसंच तिचे लाभ याविषयी जाणून घेऊ...



✻ स्कॅल्पवरची छिद्रं बळकट नसतील तर केस गळणं, कोंडा होणं अशा समस्या निर्माण होतात. हे टाळण्यासाठी केसांना तेल लावण्याआधी वाफ द्या. वाफेमुळे छिद्रं व्यवस्थित उघडतील आणि केसांना लावलेलं तेल मुळांपर्यंत पोहोचेल. तेलांमधले पोषक घटक लाभल्याने केस बळकट होतील, त्यांची वाढ वेगाने होईल. स्कॅल्पवरची त्वचा स्वच्छ होईल. ✻ वाफ दिल्यामुळे केस चमकदार, मुलायम होतात. कोरड्या, निस्तेज केसांची स्टाईल करता येत नाही. पण वाफ दिल्यानंतर केसांमध्ये आर्द्रता टिकून रहात असल्याने केसांची हवी ती स्टाईल करू शकता. ✻ केसांना घरच्या घरीही वाफ देऊ शकता. यासाठी पाणी गरम करून घ्या. त्यात स्वच्छ टर्किश टॉवेल दोन मिनिटं बुडवून बाहेर काढा. पाणी निथळून टॉवेल डोक्यावर बांधा. केसांना वाफ मिळेल.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# समाचार

सोमवार दि. ३ फेब्रुवारी २०२५ पान ३


**अर्ज़ किया है...**

*अपनी पर्वाज़ को मैं सम्त भी ख़ुद ही दूँगा*
*तू मुझे अपनी रिवायात का पाबंद न कर*
**- नामी अन्सारी**

पर्वाज - उडान ; सम्त - दिशा ; रिवायात - प्रथा ; पाबंद - बंधनयुक्त

अनेकदा माणूस चाकोरीबध्द जीवन जगण्यातच धन्यता मानतो. अर्थात त्याच्यावर असणाऱ्या जबाबदाऱ्यांमुळे तो आयुष्यात धोके पत्करण्याचा मन:स्थितीत नसतो. परंतु एखादी व्यक्ती प्रवाहापेक्षा वेगळा विचार करते. पारंपरिक पध्दत सोडून स्वत:ची दिशा स्वत: ठरवते आणि आयुष्यात असाध्य गोष्टी देखील साध्य करते. उदा. - माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, धीरूभाई अंबानी.

पान १ वरुन

## हत्याकांडाने शिर्डी हादरली

घेतल्याने मृतांचे नातेवाईक व नागरिकांनी संताप व्यक्त केला. घोडे यांच्या नातेवाईकांनी आरोपींना जोपर्यंत अटक होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याची भूमिका घेतली. या घटनांमुळे शिर्डीत तणावपूर्ण शांतता आहे. दरम्यान, साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी रुग्णालयात येऊन मयताच्या नातेवाईकांची भेट घेतली. याशिवाय शिर्डीचे ताराचंद कोते, सचिन चौघुले, कैलास कोते, शिवाजी गोंदकर, अनिता जगताप, विजय जगताप, कैलास कोते आदींनी रुग्णालयात येऊन नातेवाईकांची भेट घेतली.



# राज्य कुस्तीगीर संघाच्या उपाध्यक्षपदी आ. जगताप

**समाचार/नगर-दि.३**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाची आज अहिल्यानगर मध्ये झालेल्या २०२४ २५ वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा राज्य अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये राज्य कुस्तीगीर संघाच्या उपाध्यक्षपदी अहिल्यानगरचे आमदार संग्राम जगताप यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी राज्य कार्याध्यक्ष संदिप भोंडवे, उपाध्यक्ष प्रा. विलास कथुरे, हनुमंत गावडे, महाराष्ट्र केसरी बापू लोखंडे, अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव प्रा. डॉ. संतोष भुजबळ आदींसह राज्यातील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नवनियुक्त राज्य उपाध्यक्ष आमदार संग्राम जगताप यांचा राज्याध्यक्ष रामदास तडस यांनी सत्कार करून अभिनंदन केले. आमदार संग्राम जगताप यांच्या राज्य उपाध्यक्षपदी नियुक्तीचा ठराव राज्य उपाध्यक्ष संदीप भोंडवे यांनी मांडला त्यास उपाध्यक्ष विलास कथुरे यांनी अनुमोदन दिले.

आमदार संग्राम जगताप सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले पूर्ण राज्यामध्ये कुस्तीचे नावलौकिक वाढवण्यासाठी तसेच या क्षेत्रामध्ये नवीन पिढीला आणण्यासाठी मी पदाच्या माध्यमातून काम करणार आहे. राज्य कुस्तीगीर संघाच्या उपाध्यक्ष पदाच्या माध्यमातून चांगले काम करून या क्षेत्राला पुनरवैभव प्राप्त करून देण्यासाठी जास्तीत जास्त काम करणार आहे. राज्य कुस्तीगीर संघाने टाकलेल्या विश्वासाबद्दल सर्वांचे आभार मानतो.

# विजेत्या मल्लांना पदकांसह बुलेट, स्प्लेंडर व सोन्याच्या अंगठ्या प्रदान

**समाचार/नगर-दि.३**

नगरमध्ये झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील वरिष्ठ गट अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेतील विजेत्या मल्लांना राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आ.ज्ञानेश्वर कटके, आ.बापूसाहेब पटारे, मनपा आयुक्त यशवंत डांगे, राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष आ.संग्राम जगताप, माजी आमदार अरुण जगताप, जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव डॉ.संतोष भुजबळ, महाराष्ट्र केसरी अर्जुन शेळके, महाराष्ट्र केसरी गुलाब बर्डे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते पदकांचे व बुलेट, दुचाकी गाड्यांचे वाटप व सोन्याच्या अंगठ्या प्रदान करण्यात आल्या.

तडस म्हणाले, नगरमध्ये महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे अतिशय भव्य दिव्य व नियोजनबद्ध आयोजन आ.संग्राम जगताप यांनी करून दाखवले आहे. यावरून त्यांचे कुस्तीवर असलेले प्रेम व आत्मियता दिसते. त्यांच्या या उत्कृष्ट आयोजनाचे बक्षीस त्यांना राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती करून दिले आहे. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा ही कुस्तीगीरांना दिशादर्शक व प्रेरणा देणारी आहे. चाकणकर म्हणाल्या, महाराष्ट्रातील मर्दानी खेळाची परंपरा दैदीप्यमान करणाऱ्या भव्यदिव्य सोहळ्याने आयोजन आ.संग्राम जगताप यांनी केले आहे. या परंपरेला प्रोत्साहन देत कुस्तीगीरांच्या पाठीवर कौतुकाची थाप त्यांनी दिली आहे.




छाया – सिध्दार्थ दिक्षित,नगर

आजपर्यंत झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती किताब विजेत्यास मानाची चांदीची गदा व रोख रक्कम देण्यात येत होती. पण नगरमध्ये झालेल्या या स्पर्धेत विजेत्यांसाठी चारचाकी व दुचाकी गाड्यांची रेलचेल मी पहिल्यांदाच पहात आहे. सूत्रसंचालन अभिजित खोसे यांनी केले. निलेश मदने यांनी आभार मानले. यावेळी जिल्हा कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष प्रवीण घुले, खजिनदार शिवाजी चव्हाण, युवराज करंजुले, उमेश भागानगरे, शिवाजी कराळे, अनिल गुंजाळ, माजी उपमहापौर गणेश भोसले, संजय चोपडा, ज्ञानदेव पांडूळे, प्रकाश भागानगरे उपस्थित होते. वरिष्ठ गट अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेचा निकाल ५७ किलो गादी विभाग अंतिम निकाल– प्रथम वैभव पाटील (कोल्हापूर), द्वितीय शुभम आचपळे (नाशिक), तृतीय अभिराज माने (सोलापूर). ६१ किलो प्रथम अजय काकडे (कोल्हापूर), व्दितीय पुरुषोत्तम विसपुते (धुळे), तृतीय पवन ढोंनर (नाशिक) व पांडुरंग माने (सांगली). ६५ किलो प्रथम ज्योतिबा अटकळे (सोलापूर), द्वितीय मनीष बनकर (मुंबई), तृतीय किरण सत्रे (सोलापूर). गादी विभाग ७९ किलो प्रथम शुभम मगर (सोलापूर), द्वितीय केतन घारे (पुणे), तृतीय संदीप लटके (नगर) व तृतीय सुजित यादव (मुंबई). ८६ किलो प्रथम मुन्तब्बीर सरनोबत (धाराशिव), द्वितीय महेश फुलमाळी (नगर), तृतीय स्वप्नील काशीद (सोलापूर) व गौतम शिंदे (सोलापूर). ९२ किलो प्रथम श्रेयस गात (कोल्हापूर) व ऋषिकेश पाटील (कोल्हापूर)

माती विभागातील निकाल प्रमाणे– ५७ किलो प्रथम सौरभ हिरवे (सोलापूर), द्वितीय दिग्विजय पाटील (कोल्हापूर) व तृतीय ओमकार निगडे (पुणे), ६१ किलो प्रथम सुरज अस्वले (कोल्हापूर), द्वितीय स्वरूप जाधव (कोल्हापूर), तृतीय अमोल बालगुडे (पुणे). ६५ किलो प्रथम सद्दाम शेख (कोल्हापूर), द्वितीय अनिकेत मगर (सोलापूर), तृतीय शनिराज निंबाळकर (सोलापूर). ७९ किलो प्रथम संदेश शिरकुले (सातारा), द्वितीय ऋषिकेश शेळके (नगर), तृतीय नाथ पवार (सांगली). ८६ किलो प्रथम चंद्रशेखर गवळी, द्वितीय हनुमंत पुरी (धाराशिव) व तृतीय सुनील जाधव (सोलापूर).



# नागरदेवळे येथे गायत्री फौंडेशनचे रक्तदान शिबीर

**समाचार/नगर-दि.३**

रक्तदान हे सर्वात श्रेष्ठदान आहे. या दानाने परम सुख मिळतेच, पण आपल्या रक्तदानाचे एखाद्याचा जीव वाचतो, यासारखा आशिर्वाद नाही. त्यामुळे रक्तदानाविषयी जास्तीत जास्त जनजागृती होऊन तरुणांनी रक्तदान करावेत, असे आवाहन सरपंच रामभाऊ पानमळकर यांनी केले.

बु–हाणनगररोड वरील नागरदेवळेफाटा येथील सप्तशृंगी मंदिरात गायत्री फाउंडेशन (ट्रस्ट) या सामाजिक संस्थेने अहिल्यानगर जनकल्याण रक्त केंद्राच्या माध्यमातून रविवारी (दि.२ फेब्रुवारी २०२५) सकाळी १० वा. आयोजित रक्तदान शिबीराच्या अध्यक्षस्थानावरुन सरपंच रामभाऊ पानमळकर हे बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मानद सदस्य वसंतराव राठोड, समाजसेवक जालिंदर बोरुडे, युवानेते राकेश ताठे, निखिल शेलार, सागर निमसे पा., रेणुका कॅन्ट्रक्शनचे प्रमुख सचिन सुसे पा. आदींसह मान्यवर उपस्थित होते.

भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मानद सदस्य वसंतराव राठोड म्हणाले की, रक्तदानाचा कुंभ घेणे ही सोपी बाब नाही. जो कोणी हा रक्तदानाचा कुंभ घेतो, अथवा तो भरवितो. या रक्तदान कुंभामुळे अनेकांचे प्राण वाचवून तो एकप्रकारे अनेकांचे आशिर्वाद घेतो. म्हणूनच प्रत्येकाने विशेषतः तरुणांमध्ये रक्तदानाची जनजागृती व्हावी. दरम्यान समाजसेवक जालिंदर बोरुडे, युवानेते सागर निमसे पा., राकेश ताठे, संस्थेचे विश्वस्त निशांत ढाकणे आदींसह मान्यवरांची भाषणे झाली. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब ढाकणे यांनी केले.

## हातगाडी, भाजी विक्रेते संघटनेचे निवेदन

# नेहरु मार्केटचा प्रश्न मार्गी लावू -प्रा. शिंदे



**समाचार/नगर-दि.३**

महापालिका प्रशासनाने शहरातील नेहरु मार्केटच्या जागेवर भाजी मंडईसह तीन मजली व्यापारी संकुल बांधण्याच्या आराखडा तयार केलेले असताना यामध्ये पूर्वीच्या ओटे धारक भाजी विक्रेते व गाळेधारकांना त्यांच्या हक्काची जागा मिळवून देण्याची मागणी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्याकडे निवेदनाव्दारे करण्यात आली. यासंदर्भात हातगाडी भाजी विक्रेते संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संजय झिंजे व भाजपचे माजी नगरसेवक प्रदीप परदेशी यांनी प्रा. शिंदे त्यांची भेट घेऊन सदर प्रश्नांवर चर्चा केली.

सभापती प्रा. शिंदे यांनी नेहरु मार्केट संदर्भात माहिती घेऊन, या प्रश्नामध्ये लक्ष घालून या संदर्भात आयुक्तांच्या उपस्थितीमध्ये मुंबईला बैठक बोलावून हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. तर मनपा आयुक्त पूर्वीच्या ओटे धारक भाजी विक्रेते व गाळेधारकांना त्यांच्या हक्काची जागा देण्यासंदर्भात मानसिकता दिसत नसल्याचा आरोप करण्यात आला. नेहरु मार्केटच्या जागेवर भाजी मंडईसह तीन मजली व्यापारी संकुल बांधले जात असताना पूर्वीचे गोरगरीब ओटे धारक भाजी विक्रेते व गाळेधारकांना त्यांच्या हक्काची जागा मिळण्याची मागणी हातगाडी भाजी विक्रेते संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संजय झिंजे व भाजपचे माजी नगरसेवक प्रदीप परदेशी यांनी केली.

# सायलेन्सरमध्ये अनधिकृत बदल केल्यास होणार कारवाई

**समाचार/नगर-दि.३**

शहरात दुचाकी वाहनांच्या सायलेन्सरमध्ये अनधिकृतपणे बदल करून फटाकड्यांसारखा विचित्र आवाज करण्याचे अनुचित प्रकार दिसून येत आहेत.

अशाप्रकारे सायलेन्सरमध्ये बेकायदेशीरपणे बदल करून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या व सामाजिक शांतता भंग करणाऱ्या दुचाकी वाहन चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तशा सूचना तोफखाना, कोतवाली पोलिस स्टेशन व शहर वाहतूक नियंत्रण शाखेला देण्यात आल्या आहेत. कर्कश आवाज निर्माण करून छाप पाडण्यासाठी दुचाकीच्या सायलेन्सरमध्ये अनधिकृत फेरबदल करू नयेत व संभाव्य कारवाई टाळण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी केले आहे.




# मार्कंडेय महामुनींच्या जयघोषात जन्मोत्सव साजरा

**समाचार/नगर-दि.३**

पद्मशाली समाजाचे आराध्य दैवत मार्कंडेय महामुनींच्या जयंतीनिमित्त शहरातील गांधी मैदान येथील पुरातन मार्कंडेय मंदिरात भक्ती पूर्ण वातावरणात विधिवत पूजा करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत छिंदम यांच्या हस्ते मार्कंडेय महामुनींच्या मूर्तीस अभिवादन करण्यात आले. यावेळी मार्कंडेय महामुनींच्या जयजयकाराच्या घोषणा उपस्थित सर्व भाविकांनी दिल्या.

गांधी मैदान येथील मार्कंडेय मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सध्या सुरू असल्याने नव्या मंदिराचे बांधकाम तेथे सुरू आहे. त्यामुळे मंदिरा जवळील ओट्यावर मार्कंडेय मुनींच्या जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी देवस्थानच्या वतीने भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले तसेच गणेश आकेन परिवाराच्या वतीने भांडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पद्मशाली देवस्थानचे उपाध्यक्ष मनोज दुलम, राजू म्याना, विनायक गुडेवार, शंकर येमुल, अजय म्याना, महेश सब्बन, महेंद्र येनगुल, संजय वल्लाकट्टी, सचिन गरदास, सुनील कोडम, अनंत यंगल, नारायण कोडम, देविदास गुडा, ज्ञानेश्वर मंगलारप, माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम, सौ गरदास, सौ शिरसुल, सौ साळुंके, लक्ष्मण बुरा, गणेश आकेन, संजय चिप्पा, रमाकांत बिज्ञा, दीपक गुंडू, संजय सीद्दम, सागर येमुल, योगेश सिद्दम, महेश शिरसुल, श्रीनिवास शिवरात्रि, बालराज सामल आदींसह पद्मशाली समाज्याचे भाविक यावेळी उपस्थित होते.

# निधन वार्ता

## तुळसाबाई काळे



**समाचार/नगर-दि.३**

नगर तालुक्यातील सारोळा कासार येथील प्रगतीशील शेतकरी नानासाहेब काळे यांच्या पत्नी तुळसाबाई नानासाहेब काळे यांचे नुकतेच अहिल्यानगर येथे ह्दयविकाराने दुःखद निधन झाले आहे. मृत्युसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. निमा या वैद्यकिय संघटनेचे पदाधिकारी डॉ. राजेंद्र काळे व पोलिस दलात कार्यरत असलेल्या संजय काळे व विवाहित मुलगी मिनाक्षी नाणेकर यांच्या त्या मातोश्री होत्या.

## दामोदर बोरुडे



**समाचार/नगर-दि.३**

येथील बालिकाश्रम रोडवरील, सुडके मळा परिसरातील गौतम अपार्टमेंट नं. १ मधील रहिवासी दामोधर रामचंद्र बोरुडे (मफह गाव–करंदी, ता. पारनेर) यांचे अल्प आजाराने बुधवारी (दि.२९) निधन झाले. ते ७७ वर्षांचेहोते. ते समाज कार्यात नेहमी अग्रेसर असत. त्यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात अमरधाम, नालेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी चार मुले, दोन मुली, जावई, सुना,नातवंडे असा परिवार आहे.

## जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

# विशाल गणेश मंदिर परिसर भाविकांनी गजबजला

**समाचार/नगर-दि.३**

गणेश जयंतीनिमित्त शहराचे ग्रामदैवत विशाल गणेश मंदिर येथे गणेश जन्मावेळी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. याप्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष ॲड.अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडित खरपुडे, सचिव अशोक कानडे ,विश्वस्त विजय कोथिंबीरे, बापूसाहेब एकाडे, हरिभाऊ फुलसौंदर, रंगनाथ फुलसौंदर, ज्ञानेश्वर रासकर, पांडूरंग नन्नवरे, गजानन ससाणे, हरिचंद्र गिरमे ,चंद्रकांत फुलारी, संजय चाफे, प्रा.माणिक विधाते, नितीन पुंड आदिंसह पुजारी संगमनाथ महाराज उपस्थित होते.

प्रारंभी सकाळी अभिषेक करण्यात आला. भाविकांनी पहाटे पासून रांगा लावल्या होत्या. दुपारी गणेश जन्मवेळी



यावेळी भाविकांनी पुष्पसृष्टी केली. गणेश जयंतीनिमित्त गणेश यागचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे यजमान शंकरराव फुलसोंदर व परिवार होता. उद्योजक गणेश झंवर यांच्याहस्ते आरती करण्यात आली . यागाचे पौराहित्य नाशिक येथील मुकुंदशास्त्री मुळे यांनी केले. यानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

गणेश जयंतीनिमित्त मंदिर व परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. देवस्थान ट्रस्टच्यावतीने भाविकांसाठी मंडप, बॅरिगेटस्, पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. गणेश मंदिरातील सेवेकरी व पोलिस प्रशासन भाविकांच्या गर्दीचे नियोजन करत होते.


**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## मुंबई शेअर भाव

**ट्रम्पची टेरिफवर सही-युरोपियन मार्केट डाऊन**
**सेन्सेक्समध्येही ७०० अंकांची घट**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक ३-०१-२०२५**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

आजचा इंडेक्स : ७७११४

| | |
|---|---|
| एसीसी | १९७०-७१ |
| एशियन पेंट | २२८२-८३ |
| बजाज ऑटो लि. | ८९४१-४२ |
| बलराम फूड चिनी | ४६५-६६ |
| भारत फोर्ज | ११२५-२६ |
| क्रॉम्प्टन | ३६८-६९ |
| डीएलएफ | ६४४-४५ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | १२०४-०५ |
| ग्रॅफाईट इंडिया | ४६७-६८ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २४३५-३६ |
| आयटीसी लि. | ४५४-५५ |
| एल ॲण्ड टी लि. | ३२८२-८३ |
| रिलायन्स इंड. | १२४८-४९ |
| एसबीआय | ७५७-५८ |
| टाटा मोटर्स | ६८७-८८ |
| टाटा स्टील | १३०-३१ |
| टीसीएस | ४०५८-५९ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २१७-१८ |
| सुवेन फार्मा | ११०८-०९ |

# मानवता सेवा संस्था महिला मंडळातर्फे होम मिनिस्टर कार्यक्रम
# हळदी-कुंकू म्हणजे स्त्रीमधील आदिशक्तीची पूजा- शीतल जगताप

**समाचार/नगर-दि.३**

गृहिणी पूजन, आदर सत्कार, स्नेहमिलन, सामाजिक ऐक्यासाठी हळदी कुंकू हा कार्यक्रम साजरा होतो, उखाण्यातून स्त्रियांची कल्पकता, कविवृत्ती जागृत होते व हा आनंद एकमेकींबरोबर वाटला जातो. नवीन वर्षातील पहिला सण मकर संक्रांती हा सण मोठ्या उत्साहात साजरा होतो हळदी कुंकू समारंभात सहभागी होऊन महिला एकत्र येतात आणि त्यांच्या सामूहिक शक्तीचा सन्मान करतात. हळदीकुंकू म्हणजे स्त्रीमधील आदिशक्तीची पूजा करणे होय.

प्रभागातील विकासाच्या कामाबरोबर डॉ. सागर बोरुडे यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत ऋणानुबंध निर्माण केले असल्याचे प्रतिपादन माजी नगरसेविका शीतल जगताप यांनी केले.




मानवता सेवा संस्था महिला मंडळ व डॉ. सागर बोरुडे आयोजित होम मिनिस्टर स्व संरक्षणाचे धडे व रील स्टार आरती जाळगावकर यांच्या उपस्थितीत हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर, माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, रीलस्टार आरती जळगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्ष आशाताई निंबाळकर, किरण बारस्कर, रोहिणी अंकुश, रंजना उकिरडे, राणी भाकरे, हेमलता कांबळे, शैला गिरे, रजनी आमोदकर, कांचन इंगोले, अंबिका घोलप, श्रुतिका दरेकर, दिपाली उदमले, वैशाली राजहंस, अनिता भोसले आदीसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

मानवता सेवा संस्था वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात, महिलांनी एकत्रित येऊन आपल्या विचारांची देवाण–घेवाण व्हावी यासाठी सालाबाद प्रमाणे हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले जाते, प्रभागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहून सांस्कृतिक कलेचा आनंद घेत असतात, यावेळी महिलांना स्व संरक्षणाचे धडे देण्यासंदर्भात मार्गदर्शन केले जाते, होम मिनिस्टर कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध स्पर्धेचे आयोजन करत बक्षिसाचे वाटप केले जाते तसेच सर्व महिलांना वाण वाटप केले जाते. या कार्यक्रमात रीलस्टार आरती जाळगावकर यांनी महिलांना मार्गदर्शन केले असल्याची माहिती माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी दिली.

# ओंकारेश्वर महादेव मंदिरात हरिनाम सप्ताहाची सांगता



**समाचार/नगर-दि.३**

उपजोनिया पुढती येऊ । काला खाऊ दहीभात ।। वैकुंठी तो ऐसे नाही श्र कवळ काही काल्याचे श्रश्र या अभंगावर विवेचन करताना आपण सर्व अतिशय भाग्यवान आहोत कारण जो काला वैकुंठात नाही, जो काला स्वर्गलोकात नाही, देवदुर्लभ असणारा काला आपल्याला साधू संतांच्या कृपेने श्री.गुरु भास्करगिरी बाबांच्या कृपेने आज सेवन करण्यासाठी मिळत आहे. काला म्हणजे जीवनाची पूर्णता तसेच काल्याचे प्रकार सांगत असताना तीन प्रकार सांगितले. दहीभाताचा काला, हरिनामाचा खिचडी काला, जीव–शिव ऐक्य काला हा काला फक्त त्रैलोक्यात वारकरी संप्रदायातच सेवन करायला मिळतो असे, हभप संदीप महाराज खोसे महाराजांनी सांगितले.

तपोवन रोड ओंकारेश्वर महादेव मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह व शिवलीलामृत पारायण सोहळ्याची सांगता गुरु भक्त संदीप महाराज खोसे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली, यावेळी मनपा मा. विरोधी पक्षनेते संपत बारस्कर, रवींद्र आजबे, अविनाश बाचल, गजानन बाचल, सुभाष कासार, प्रसाद नाईक, बंडू राऊत, सचिन चन्ने, नितीन चन्ने, सुनील शेलार, नितीन शेलार, दत्तात्र्य वडे, विशाल व्यहवारे, विलास गुंड आदीसह उपस्थित होते.

# श्री मंगलमूर्तींच्या माघी रथयात्रेचे चिंचवड येथून मोरगावकडे प्रस्थान



**समाचार/नगर-दि.३**


महासाधू श्री मोरया गोसावी महाराज प्राप्त श्री मंगलमूर्तींची पारंपरिक माघी रथयात्रेस भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला आहे.

चिंचवड येथील गाणपत्य संप्रदायातील महान संत श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी महाराज यांना सन १४८९ मध्ये मोरगावच्या पवित्र श्री गणेश कुंडातून प्राप्त झालेले श्री मंगलमूर्ती माघ महिन्यात मोरगाव येथे नेण्याची परंपरा सुरू केली. श्री मोरया गोसावी महाराजांनी सुमारे ५२६ वर्षांपूर्वी सुरू केलेली ही यात्रा अखंडपणे सुरू झाली आहे, चिंचवड, सासवड, जेजुरी, मोरगाव असा पालखीचा मार्ग आहे. श्री गणेश जयंती निमित्त पालखी मोरगावला मुक्काम करते. पालखीचा परतीचा प्रवास आज सोमवारी सुरू झाला. मोरगाव, जेजुरी, सासवड, थेऊर, सिद्धटेक, पुणे असा प्रवास करीत ८ फेब्रुवारी रोजी पालखी चिंचवड येथील श्री मोरया गोसावी महाराज मठ येथे येईल. पारंपरिक धुपारतीने यात्रेचा समारोप होईल. माघी रथयात्रेत देवस्थानचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, विश्वस्त श्री जितेंद्र देव व श्री केशव विद्वांस सहभागी झाले होते. या सोहळ्यात मार्गावर ठिकठिकाणी पालखीचे स्वागत होत आहे. हजारो भक्त यात सहभागी होत असून, श्री मोरया गोसावी महाराज प्राप्त श्री मंगलमूर्तीचे दर्शन घेत आहेत.

# मागणी नसल्याने मटारच्या भावात घसरण कोथिंबिरीच्या भावात वाढ

**पुणे, दि. ३–** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत रविवारी झालेल्या उलाढालीत मटारसह आलं, लसूण, काकडी यांच्या भावात घसरण झाली. अपेक्षित मागणी नसल्याने मटारचे भाव उतरले. कोथिबिरीचे भाव वाढले. पडवळ भाजीची आवक मोठ्या प्रमाणावर झाली. बाजारसमितीत कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तमिळनाडू, राजस्थान या सहा राज्यातून ट्रक फळभाज्यांची आवक झाली. त्यात कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरात येथून कोबी. कर्नाटकातून भुईमूग शेंगा, घेवडा, पावटा. आंध्र प्रदेशातून शेवगा, तमिळनाडूतून शेवगा, तोतापुरी कैरी, राजस्थान येथून गाजर, मध्य प्रदेशातून मटार, लसूण यांची आवक झाली. पालेभाज्यांमध्ये करडई, अंबाडी, पालक यांच्या भावात घट झाली. कोथिंबीर, चवळई यांचे भाव मात्र वाढले. शेपू, कांदा पात, हरभरा गड्डीचे भाव स्थिर होते. कोथिंबीर दीड लाख जुडी आणि हरभरा हजार जुडी आवक झाली. फळबाजारात खरबूज, चिक्कू, पेरूचे भाव स्थिर होते.

**पुणे अंतरंग**



– राजेंद्र पंढरपुरे –

# जीटीटीएस २०२५ अंतर्गत भारतीय आयटीएमइ संस्थेचा वस्त्रोद्योग आणि सहयोगाकरिता जागतिक मंच

भारतीय जागतिक वस्त्रोद्योग यंत्रसामग्री प्रदर्शन संस्था (भारतीय आयटीएमई संस्था) पुन्हा एकदा २१ ते २३ जानेवारीला बॉम्बे एक्झिबिशन सेंटर गोरेगाव येथे वस्त्रोद्योग क्षेत्रातील सर्वात मोठा ग्लोबल टेक्सटाइल टेक्नोलॉजी आणि इंजिनिअरिंग शो (जीटीटीईएस २०२५) च्या तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने वस्त्रोद्योग क्षेत्रात वादळ निर्माण करण्यासाठी सज्ज आहे. भारतीय आयटीएमई संस्थेमार्फत आयोजिलेला हा कार्यक्रम जगातील वस्त्रोद्योग व संबंधित अभियांत्रिकी क्षेत्रासाठी एक विश्वासार्ह मंच उपलब्ध करून देत आहे ज्यायोगे या क्षेत्रातील सध्यापर्यंत झालेले आधुनिकीकरण, नाविन्यपूर्ण प्रकल्प आणि जागतिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील संधी यांच्या सहाय्याने पुन्हा या क्षेत्रास प्रकाशझोतात आणले जाऊ शकेल.

जे भारतीय जागतिक वस्त्रोद्योग यंत्रसामग्री प्रदर्शन संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष केतन संघवी या प्रदर्शना संदर्भात बोलताना म्हणाले,''जीटीटीईएस २०२५ हा एक अत्यंत परिवर्तनशील सोहळा आहे आणि जागतिक स्तरावर वस्त्रोद्योग आणि यंत्रसामग्री तंत्रज्ञानामध्ये होणाऱ्या आमूलाग्र विकासाबद्दल जागरूकता निर्माण करणे हा या सोहळ्याचा प्रमुख उद्देश आहे. सूत आणि कापड या पलीकडे जाऊन यांच्याशी निगडीत विणकाम, शिवणकाम, प्रोसेसिंग, फिनिशिंग, कपडे आणि तांत्रिकी वस्त्र, पर्यावरण पूरक प्रक्रिया तसेच शाश्वत विकास यावर देखील या सोहळ्यामध्ये भर दिला जात आहे. या प्रदर्शनात अनेक नावाजलेले उत्पादक प्रदर्शक हे आपल्या अभिनव संकल्पना, उत्पादन उद्घाटन तसेच अमूल्य भेटींच्या संधींसाठी या प्रदर्शनात उत्साहाने सहभागी होत आहेत व आपण देखील याचे साक्षीदार असणार आहोत.''

# उद्योजकतेला चालना देण्यासाठी गेलची स्टार्ट-अप कॉर्पस् फंडात ५०० कोटीची वाढ

गेल (इंडिया) लिमिटेडने त्यांच्या स्टार्ट–अप गुंतवणूक निधीमध्ये लक्षणीय वाढ करण्याची घोषणा केली आहे, ज्यामुळे स्टार्ट–अपमध्ये गुंतवल्या जाणाऱ्या निधीची रक्कम १०० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपयांपर्यंत वाढवली आहे. या धोरणात्मक पावलाचा उद्देश नवोपक्रमाला चालना देणे, उदयोन्मुख व्यवसायांना पाठिंबा देणे आणि भारताच्या स्टार्ट–अप परिसंस्थेच्या वाढीला गती देणे आहे. वाढीव निधी

GAIL (India) Limited

विविध क्षेत्रांमध्ये आशादायक स्टार्ट–अप्सना चालना देण्यासाठी वापरला जाईल, ज्यामध्ये स्वच्छ ऊर्जा, अक्षय ऊर्जा, ऊर्जा साठवणूक, इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि डिजिटल परिवर्तन इत्यादींवर लक्ष केंद्रित केले जाईल. नाविन्यपूर्ण उपक्रमांना पाठिंबा देण्याची गेलची वचनबद्धता सरकारच्या आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. गेलने जुलै २०१७ मध्ये आशादायक स्टार्ट–अप्समध्ये गुंतवणूक करण्यासाठी आपला महत्त्वाकांक्षी स्टार्ट–अप उपक्रम 'पंख' सुरू केला होता. आतापर्यंत, गेलने सीबीजी, इलेक्ट्रिक मोबिलिटी, आयओटी, लॉजिस्टिक्स आणि पर्यावरण इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या ३६ स्टार्ट–अप्समध्ये गुंतवणूक केली आहे.

# मुंबईत सर रतन टाटा बिझनेस एक्सलन्स ॲवॉर्ड्स २०२५ संपन्न



भारताचे उद्योगरत्न म्हणून संपूर्ण जगात नावलौकिक मिळवलेल्या दिवंगत उद्योगपती रतन टाटा यांचा वाढदिवस इंडिया मीडिया लिंक अँन्ड मॅनेजमेंटच्यावतीने मुंबईतील माटुंगा येथील सांस्कृतिक केंद्रात जल्लोषात साजरा करण्यात आला. दिवसभर सुरू असलेल्या या कार्यक्रमात देशभरातून उपस्थित झालेल्या मान्यवरांना उद्योग आणि सामाजिक वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना आकर्षित सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. बॉलीवूडचे नामांकित कलाकार माही शर्मा ॲक्ट्रेस (कुंमकुम भाग्य फेम), दिलीप सेन (म्युझिक डायरेक्टर), हनी भल्ला एक्ट्रेस, विश्वजीत सोनी (प्रेम चोपड़ा), उदय दहिया (कॉमेडी किंग), संजय वर्मा (कॉमेडी किंग), रमाकांत मुंडे (बॉलीवूड फोटोग्राफर आणि पीआरओ) व समाजसेवी के रवी दादा यांनी सर्व मान्यवरांचा यथोचित सन्मान केला.


या कार्यक्रमात दिवंगत उद्योगपती रतन टाटा यांच्या भव्य तैलचित्राचे उद्घाटन के रवी दादा, डॉ. रत्नाकर आहिरे व सिने क्षेत्रातील प्रसिद्ध अभिनेत्री माही शर्मा, हनी भल्ला यांच्या हस्ते झाले. त्यापूर्वी जे जे रुग्णालयातील तज्ञ टीमच्यावतीने रक्तदान शिबिरात मुंबईकरांनी सहभाग दर्शविला. यावेळी स्वप्नाली यादव सत्यवान रेडकर, अभिजीत सोनवणे, फैजुला खान, डॉ. एस एस शास्त्री आदी महाराष्ट्र आणि भारतातून आलेल्या मान्यवरांचा सन्मानचिन्हे देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

# सेंटरफ्रूटचा नवीन कॅम्पेन ब्रँडला अटू चवीवर करतोय केंद्रित




परफेटी वैन मेलच्या घराण्याचे ब्रँड सेंटरफ्रूट त्याच्या प्रतिष्ठित कॅम्पेनसह चवीला महिमामंडित करत आहे, ज्यात मनोरंजक अंमलबजावणी आणि स्मरणीय टॅगलाईन कैसी जीभ लपलपाई? आहे. संवादामध्ये नवा ठसा उमटवताना, हा कॅम्पेन ब्रँडच्या मूलभूतं वाद्यावर लक्ष केंद्रित करतो. फळांच्या चवीचा अटू स्वाद जो उपभोक्त्यांना आणखी हवाहवासा बनवतो. या कॅम्पेनमध्ये एक रोमांचक नवीन टीवीसी सादर केला जात आहे, ज्याचे दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक प्रसून पांडे यांनी केले आहे. सदर विज्ञापन सेंटरफ्रूटच्या अनोख्या क्षमतेला दर्शवितो, ज्यामुळे तो आपल्या खास चवीने उपभोक्त्यांना आनंदित करतो. कैसी जीभ लपलपाई? ही टैगलाइन सेंटरफ्रूटने प्रत्येक बाईटसह दिलेल्या अटू आणि मजेदार अनुभवाचे उत्तम प्रतिनिधित्वसुद्धा करते.

सेंटरफ्रूट त्याच्या विशिष्ट चवी आणि आकर्षक संवादासाठी पूर्वी पासून ओळखला जात आहे. आणि हा नवीन कॅम्पेन ब्रँडच्या मुख्य ताकदीवर आधारित आहे, ज्याला एका समकालीन आणि ताज्या पद्धतीने जिवंत केले आहे, जे आजच्या उपभोक्त्यांच्या पसंतीशी सुसंगत आहे.




संकलन–संयोजन
**सुबोध रणशेवरे**
subodh.ranshevre rediffmail.com

## शब्दखेळ – ३१३

खाली दिलेल्या चौकोनात जुन्या संगीत नाटकाचे लेखक आणि संपादक यांचे नाव लपलेले आहे शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | कि | सृ | दा | ल | ने | टा | टा |
| दा | ब | उ | दा | णे | थी | गा | रा |
| नी | द्या | वा | ट | ए | भा | ह | गो |
| ख | नी | डी | रो | सा | जी | का | द |
| अं | ळू | या | दा | र | ण | चे | व |
| ध | बी | र | ल | ची | वि | प्रो | ख |
| नी | डी | र्ला | ड | झ | न | ल | स्क |
| दि | ला | र्स | न | ल | ले | टू | र्बो |

### शब्दखेळ – ३१२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| लो | शि | व्यं | क | म | थ | श | प |
| क | लो | न | वा | फ | कि | रा | दा |
| म | क | घु | ग | लो | ड | चं | क |
| त | रा | आ | ब्रु | क | फी | वा | प |
| बा | टे | ख | कि | न | टा | ळ | त्र |
| स | क | स्कु | पि | य | णी | न | हु |
| र | ल | को | स | क | न | ल्या | ता |
| से | ल | क | स | मा | ज | ग | गु |

उत्तर – व्यंकटेश माडगुळकर

## शेतकऱ्यांच्या कर्जमर्यादेत वाढ



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी मोठ्या घोषणा केल्या. अर्थमंत्र्यांनी प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना, डाळींमध्ये स्वावलंबन, बिहारमध्ये मखाना बोर्डाची स्थापना आणि आसाममध्ये युरिया निर्मिती सुरू करण्याची घोषणा केली आहे. याशिवाय किसान क्रेडिट कार्डची मर्यादा तीन लाख रुपयांवरून पाच लाख रुपये करण्यात आली आहे. यापैकी काही घोषणा जुन्याच आहेत. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी त्यात काहीच नाही. मुळात कृषी पणन उद्योगावर भर देण्याचा उल्लेख त्यात नाही. प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेंतर्गत कृषी उत्पादकता कमी असलेल्या शंभर जिल्ह्यांची निवड केली जाईल. यामुळे उत्पादकता वाढण्यास, शेतीमध्ये विविधता आणण्यास, सिंचन आणि काढणीनंतरची साठवण क्षमता वाढण्यास मदत होईल, असे सांगण्यात आले आहे. या योजनेचा फायदा १.७ कोटी शेतकऱ्यांना होणार आहे. डाळींमध्ये स्वावलंबनाला चालना देऊ, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यापूर्वीच सांगितले होते. त्यानुसार शेतकऱ्यांनी डाळवर्गीय पिके घेतली; परंतु डाळवर्गीय पिकांची खरेदी केली नाही. तूर, हरभरा, मूग, उडीदाचे भाव फारसे वाढले नाहीत. त्यामुळे शेतकरी पुन्हा डाळवर्गीय पिकांपासून दूर गेला. आता सहा वर्षांची घोषणा केली असली, तरी शेतकरी किती विश्वास ठेवणार, असा प्रश्न आहे. 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' तीन प्रकारच्या डाळींची खरेदी करणार आहेत, असे सरकारने सांगितले असले, तरी प्रत्यक्षात या संस्थांचा खरेदीचा अनुभव फारसा चांगला नाही. कांद्याच्या खरेदीचाही अनुभव शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे.

अन्नधान्य आणि फळांची मागणी वाढत आहे. यासाठी राज्यांच्या सहकार्याने केंद्र सरकार योजना सुरू करणार आहे. याचा फायदा कृषी उत्पादन संस्थांना होणार आहे. याशिवाय बिहारमध्ये मखाना बोर्ड स्थापन करण्यात येणार आहे. बिहारमधील लोकांसाठी मखानाचे उत्पादन आणि प्रक्रियेला प्रोत्साहन देण्याची ही एक विशेष संधी आहे. यामध्ये मखाना मंडळ शेतकऱ्यांना मदत करणार आहे. अर्थात ही घोषणा बिहार विधानसभेच्या निवडणुका लक्षात घेऊन केली आहे. किसान क्रेडिट कार्डचा फायदा ७.७ कोटी शेतकरी, मच्छीमार आणि दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना होतो. त्यांना अल्प मुदतीच्या कर्जाची सुविधा मिळते. आता कर्जाची मर्यादा तीन लाख रुपयांवरून पाच लाख रुपये करण्यात येणार आहे. गेल्या वर्षभरात खतांचे भाव वाढले. खतांच्या टंचाईला सामोरे जावे लागले. आता युरियाच्या निर्मितीवर भर देण्यात आला असला तरी शेतीपेक्षाही औद्योगिक प्रकल्पांसाठी युरियाची चोरट्या मार्गाने मोठी विक्री होते. त्यावर आळा घालण्यासाठी सरकारने काहीच केले नाही. पूर्वेकडील बंद असलेले तीन युरिया प्लांट पुन्हा सुरू करण्यात आले आहेत. युरिया उत्पादनात स्वयंपूर्णतेच्या दिशेने टाकलेले हे पाऊल चांगले आहे. त्यामुळे आयातीवरचा खर्च कमी होणार आहे; परंतु खतांच्या किंमती कमी होण्यासाठी हे प्रकल्प किती उपयुक्त ठरतील, याचे उत्तर मिळत नाही. याशिवाय सहकार क्षेत्राला कर्ज उपलब्ध करून देण्याच्या कामासाठी सरकार राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाला मदत करेल.

देशाच्या कृषी अर्थसंकल्पात स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. १९४७-४८ मध्ये अर्थसंकल्प सादर झाला, तेव्हा कृषी क्षेत्राला २२.५ कोटी रुपये देण्यात आले होते. तेदेखील धान्य अनुदानासाठी होते. यानंतर २०१३-१४ मध्ये कृषी बजेट २७ हजार कोटी रुपये करण्यात आले. २०२४-२५ मध्ये कृषी बजेट १.५१ लाख कोटी रुपये झाले. देशाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राचा वाटा तीन टक्के आहे. किसान क्रेडिट कार्ड योजना १९९८ मध्ये सुरू झाली. याअंतर्गत शेती आणि संबंधित कामात गुंतलेल्या शेतकऱ्यांना नऊ टक्के व्याजदराने अल्प मुदतीचे पीक कर्ज दिले जाते. सरकार शेतकऱ्यांना व्याजावर दोन टक्के सवलत देते आणि वेळेवर पैसे भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून तीन टक्के व्याजात कपात केली जाते. अशा प्रकारे शेतकऱ्यांना वार्षिक चार टक्के दराने कर्ज मिळते. या योजनेंतर्गत सक्रिय क्रेडिट कार्ड खात्यांची संख्या ३० जून २०२३ पर्यंत ७.४ कोटींहून अधिक होती आणि त्यांच्यावरील थकित कर्ज ८.९ लाख कोटी रुपये होते. आजकाल शेतीचा खर्च खूप वाढला आहे; परंतु किसान क्रेडिट कार्डवरील कर्जाची मर्यादा अनेक वर्षांपासून वाढवण्यात आलेली नव्हती. सरकारने ही व्याप्ती आता वाढवल्यामुळे कृषी क्षेत्रातील उत्पादनाला चालना मिळेल तसेच कृषी उत्पन्न वाढण्यास मदत होईल. सरकारच्या या पावलामुळे शेतकऱ्यांची जीवनशैली सुधारेलच; शिवाय बँकिंग व्यवस्थेचा धोकाही कमी होईल, कारण शेतकरी कर्जाची वेळेवर परतफेड करतील. कारण किसान क्रेडिट कार्डचे उद्दिष्ट केवळ मोठी जमीन असलेले शेतकरीच नाही, तर लहान जमीन असलेले शेतकरी आणि पशुपालन आणि मत्स्यपालन यासारख्या व्यवसायात गुंतलेल्या लोकांनादेखील त्याच्या कक्षेत आणणे आहे.

'नाबार्ड'च्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर २०२४ पर्यंत सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांनी १६७.५३ लाख किसान क्रेडिट कार्ड जारी केली. त्यांची एकूण क्रेडिट मर्यादा १.७३ लाख कोटी रुपये होती. यामध्ये १०,४५३.७१ कोटी रुपयांच्या क्रेडिट मर्यादेसह डेअरी शेतकऱ्यांसाठी ११.२४ लाख कार्ड आणि ३४१.७० कोटी रुपयांच्या क्रेडिट मर्यादेसह मत्स्य शेतकऱ्यांसाठी ६५,००० किसान क्रेडिट कार्डांचा समावेश आहे. कापूस वाढीसाठी पाच वर्षांचे मिशन असणार आहे. भारतीय कापसाला परदेशात मागणी नसते. त्यामुळे लांब धाग्याच्या कापूस लागवडीवर भर देण्याचा निर्णय चांगला असला, तरी कापसाच्या हमी भावाचा प्रश्न तसाच आहे. दहा वर्षांपूर्वी कापसाला जेवढा भाव होता, तेवढाही भाव नसल्याने शेतकरी नाराज होते. कृषी क्षेत्रात एआय वापर करण्याचाही निर्धार अर्थमंत्र्यांनी बोलून दाखवला. एकंदरीत, कृषि क्षेत्रासाठी हा अंमलबजावणीकडे लक्ष वेधणारा अर्थसंकल्प आहे.

■ **प्रा. अशोक ढगे,**
**कृषितज्ज्ञ**



## आरोग्य क्षेत्र; आरोग्यदायी संकल्प

ताज्या अर्थसंकल्पाद्वारे निर्मला सीतारामन यांच्या पोतडीतून आरोग्यक्षेत्रासाठी काही तरी खास बाहेर आले. त्यामुळे लोकांना उपचार घेणे सोपे होईल. त्यांनी आरोग्य क्षेत्राबाबत मोठ्या घोषणा केल्या आहेत. त्यांनी देशभरात २०० 'कॅन्सर डे केअर सेंटर' सुरु करण्याची घोषणा केली आहे. यासोबतच औषधांमध्येही सवलत जाहीर करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत लोकांना उपचार घेणे सोपे होणार आहे. रुग्ण सहाय्य कार्यक्रम फार्मास्युटिकल कंपन्यांद्वारे चालवल्या जाणाऱ्या रुग्ण सहाय्य कार्यक्रमांना मूलभूत सीमा शुल्का (बीसीडी) मधून पूर्णपणे सूट दिली जाईल. रुग्णांना औषधे मोफत दिली जातील, तेव्हाच ही सवलत मिळेल. याशिवाय ३७ नवीन औषधे आणि १३ नवीन रुग्ण सहाय्य कार्यक्रमदेखील सूट यादीत समाविष्ट केले जातील. परिणामी, गरीब आणि गरजू रुग्णांना महागडी औषधे मोफत किंवा कमी दरात मिळू शकणार आहेत. अर्थमंत्र्यांच्या घोषणेमुळे जीवरक्षक औषधांच्या किमती कमी होतील. दुर्मिळ आजार आणि कर्करोगासारख्या जुनाट आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना दिलासा देण्यासाठी सरकारने ३६ जीवरक्षक औषधांना मूलभूत सीमा शुल्कातून पूर्णपणे सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय सहा जीवरक्षक औषधांवरील सीमा शुल्क पाच टक्क्यांपर्यंत कमी केले जाईल. ही औषधे बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या बल्क औषधांवरही सूट किंवा सवलतीचे शुल्क लागू होईल. त्यामुळे औषधांच्या किमती कमी होऊन रुग्णांना स्वस्तात औषधे मिळू शकतील.

कर्करोगावरील उपचार अधिक सुलभ करण्यासाठी सरकारने येत्या तीन वर्षांमध्ये सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये 'डे केअर कॅन्सर केंद्रे' स्थापन करण्याची योजना आखली आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात दोनशे नवीन कर्करोग केंद्रे उघडली जातील. त्यामुळे कर्करोगग्रस्तांना उपचारासाठी दूरवरच्या शहरात जावे लागणार नाही. त्यांना स्थानिक पातळीवर चांगल्या सुविधा मिळू शकणार आहेत. वैद्यकीय शिक्षणाला चालना देण्यासाठी सरकारने मोठी पावले उचलली आहेत. सरकारने गेल्या दहा वर्षांमध्ये १.१ लाख नवीन पदवी आणि पदव्युत्तर वैद्यकीय जागा वाढवल्या आहेत. ही वाढ १३० टक्के आहे. पुढील पाच वर्षांत आणखी ७५ हजार जागांची भर घालण्याची योजना आहे. यामध्ये पुढील वर्षभरात दहा हजार नवीन जागा सुरू केल्या जातील. त्यामुळे देशातील डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची संख्या वाढेल आणि आरोग्य सेवांचा दर्जा सुधारेल, असा दावा करण्यात आला असला, तरी यापूर्वी जाहीर केलेली महिला रुग्णालये अजून प्रत्यक्षात आलेली नाहीत. सरकारचे नियोजन शहरी उपजीविका आणि आरोग्य शहरी गरीब आणि असुरक्षित गटांना आर्थिक स्थैर्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकार विविध उपक्रमांवर काम करत आहे. शहरी उपजीविका मजबूत करणे आणि लोकांच्या राहणीमानात सुधारणा करणे हा त्याचा उद्देश आहे. असे असले, तरी गोरगरिबांना आरोग्य विम्याच्या क्षेत्रात आणण्यासाठी आणि आपत्कालीन परिस्थितीत त्यांच्या उपचाराच्या खर्चासाठी धावाधाव करावी लागू नये, म्हणून आरोग्य विमा योजनांना प्रोत्साहन आणि त्यावरचा जीएसटी कमी करण्यासारख्या योजना हाती घेणे शक्य होते, ते मात्र अर्थमंत्र्यांनी केले नाही.

■ **डॉ.अजिंक्य बोराडे**

## भांडवली बाजार नाराज



**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्राप्तिकरात सवलत देऊन खप वाढवला; पण कॅपेक्स कमी करून शेअर बाजाराच्या अपेक्षा मोडल्या. सर्वात महत्वाचे म्हणजे यापुढे वार्षिक बारा लाख रुपयांपर्यंतच्या प्राप्तिकरावर कोणताही कर भरावा लागणार नाही. २०२५ च्या अर्थसंकल्पातील ही सर्वात मोठी घोषणा होती. प्राप्तिकरात सवलत देण्यामागील सरकारचा पहिला उद्देश म्हणजे घटती उलाढाल वाढवणे. यामुळे लोकांच्या हातात पैसे येतील, हे पैसे ते आपल्या गरजांसाठी खर्च करू शकतील किंवा गुंतवणूक करू शकतील; मात्र हा अर्थसंकल्प शेअर बाजाराच्या दृष्टिकोनातून तटस्थ राहिला. भाषणादरम्यान, बाजार लक्ष ठेवून असलेल्या घोषणांमध्ये कॅपेक्सचा आकडा महत्त्वाचा होता; परंतु सरकारने कॅपेक्समध्ये कोणतेही महत्त्वपूर्ण बदल केले नाहीत.**

सरकारने कॅपेक्स १०.८० लाख कोटी रुपयांवर ठेवले. इन्फ्रास्टक्चरल बूस्टसाठी शेअर बाजार कॅपेक्स वाढण्याची वाट पाहत होता. मंदावलेल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी उत्पादन आणि पायाभूत सुविधांसाठी अर्थसंकल्पात काही तरी विशेष असेल, अशी अपेक्षा होती; पण अर्थसंकल्पीय भाषणात तसे काही घडले नाही. या घोषणेनंतरच बाजाराची सुरुवातीची वाढ संपली आणि बेंचमार्क निर्देशांक वाढत्या घसरणीकडे गेले. बाजाराची निराशा झाली. नंतर बाजार थोडाफारच सावरला. रुपयाची घसरण हाताळण्यासाठी विमा क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूक ७४ टक्क्यांवरून शंभर टक्के करण्यात आला. तसेच पर्यटन क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले. तथापि, अल्पकालीन आणि दीर्घकालीन करांमध्ये बदल न केल्याने बाजारात निराशा राहिली. प्राप्तिकर सवलतीनंतर पायाभूत सुविधांना चालना न मिळाल्याने शेअर बाजाराला अपेक्षित गती मिळू शकली नाही.

अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात पुढील पाच वर्षांत ५० हजार अटल टिंकरिंग लॅब सुरू करण्याची घोषणा केली आहे. याशिवाय सरकारी माध्यमिक शाळांमध्ये ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी जाहीर करण्यात आली आहे. भारतीय भाषा पुस्तक योजना सुरू करण्यात येणार आहे. शाळांमध्ये उच्च शिक्षणासाठीही ही योजना सुरू करण्यात येणार आहे. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) बाबतही मोठी घोषणा केली आहे. 'सेंटर ऑफ एक्सलन्स'चा प्रस्ताव त्यांनी दिला आहे. यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

■ **महेश देशपांडे,**
आर्थिक घडामोडींचे अभ्यासक

## ईव्हीपासून फेरीवाल्यांपर्यंत सर्वांना मदतीचा हात!

संसदेत सादर करण्यात आलेल्या २०२५ च्या अर्थसंकल्पात रस्त्यावरील विक्रेत्यांसाठी मोठी घोषणा करण्यात आली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 'पंतप्रधान स्ट्रीट व्हेंडर्स सेल्फ-रिलेंट फंड योजने'तर्गत रस्त्यावरील विक्रेत्यांना क्रेडिट कार्ड भेट दिले आहे, असे म्हटले. यातून सरकारचा अपारंपरिक ऊर्जा धोरणाला प्रोत्साहन देण्याचा हेतू दिसला. फेरीवाल्यांना या कार्डअंतर्गत तीस हजार रुपयांपर्यंतची रक्कम कर्जाऊ घेता येईल. म्हणजेच या कार्डद्वारे रस्त्यावरील विक्रेते किंवा आपला व्यवसाय वाढवू इच्छिणारे ३० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज घेऊ शकतात. या क्रेडिट कार्डचे व्याजदर नाममात्र असणार आहेत. २०२० मध्ये कोविड काळामध्ये सुरू करण्यात आलेल्या या योजनेंतर्गत, रस्त्यावरील विक्रेत्यांना आपला व्यवसाय वाढवण्यासाठी मदत करण्यात येत होती. कोरोनाकाळातील टाळेबंदीमुळे रस्त्यावरील विक्रेत्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यांचा व्यवसाय सुधारण्यासाठी मदत करण्यातच येत आहे. आता त्याला आणखी आधार देण्यात येणार आहे. याअंतर्गत रस्त्याच्या कडेला फळे, भाजीपाला, फुले, सलून, पान आदींची दुकाने थाटणाऱ्या छोट्या दुकानदारांना कर्जाची सुविधा उपलब्ध झाली आहे. प्रधानमंत्री स्वानिधी योजनेंतर्गत, लहान रस्त्यावरील विक्रेते बँकेकडून एकूण ५० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज घेऊ शकतात. दुकानदार बारा महिन्यांच्या कालावधीसाठी पहिल्या हप्त्यात दहा हजार रुपयांपर्यंत कर्ज घेऊ शकतात. दुसऱ्या हप्त्यात किमान १५,००० रुपये ते कमाल २०,००० रुपये १८ महिन्यांच्या कालावधीसाठी तर तिसऱ्या हप्त्यात किमान ३०,००० रुपये ते कमाल ५०,००० रुपये ३६ महिन्यांसाठी दिले जातात. या योजनेंतर्गत कर्ज घेण्यासाठी दुकानदारांकडून कोणत्याही प्रकारची हमी घेतली जाणार नाही. कर्ज सुलभ मासिक हप्त्यांमध्ये भरावे लागेल. तसेच, पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत, कर्जाच्या पेमेंटवर आकारल्या जाणाऱ्या व्याजावर वार्षिक सात टक्के सबसिडी दिली जात आहे. व्याज अनुदानाची रक्कम थेट खात्यात पाठवली जाईल.

सीतारामन यांनी संसदेत २०२५ चा अर्थसंकल्प सादर करताना देशातील पायाभूत ईव्ही सुविधा वाढवण्यासाठी अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. या घोषणांमुळे देशातील ईव्ही क्षेत्राला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. ऑटोमोबाईल क्षेत्रातील शाश्वत आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाला चालना देण्याच्या उद्देशाने केलेल्या सुधारणांमध्ये हायब्रीड आणि इलेक्ट्रिक वाहनांवर कमी जीएसटी दर, ईव्ही घटक आणि बॅटरी उत्पादनासाठी पीएलआय योजनांचा विस्तार, हायड्रोजन इंधन आणि प्रगत गतिशीलता एक योजना समाविष्ट करणे अपेक्षित आहे आणि वाहनांच्या स्क्रॅपिंगला प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहन योजना जाहीर केल्या जाणार होत्या. त्यापैकी काहीच पूर्ण झाल्या आहेत. मॉड्युलर अणुभट्ट्या वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे. त्यासाठी वीस हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. लहान मॉड्युलर अणुभट्ट्यांच्या संशोधन आणि विकासासाठी अणुऊर्जा मिशनची स्थापना केली जाईल. २०३३ पर्यंत किमान पाच स्वदेशी लहान मॉड्युलर अणुभट्ट्या कार्यान्वित होतील. जहाजांची श्रेणी आणि क्षमता वाढवली जाईल. अतिरिक्त पायाभूत सुविधांसह जहाजांची श्रेणी आणि क्षमता वाढवण्यासाठी जहाजबांधणी क्लस्टर्सची सोय केली जाईल. कोबाल्ट पावडर आणि कचरा, लिथियम-आयन बॅटरी स्क्रॅप, शिसे, जस्त आणि इतर बारा गंभीर खनिजांना करातून सूट दिली जाईल.

■ **प्रा. जयसिंग यादव**

## सकारात्मक अर्थसंकल्प

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सादर केलेला अर्थसंकल्प संगणक आणि इलेक्ट्रॉनिक इंडस्ट्रीसाठी सकारात्मक आहे. त्यात सॉफ्टवेअर्स, एक्सपोर्टस किंवा आय. टी. क्षेत्रासाठी थेट तरतुदी नसल्या तरी लघु उद्योजकांसाठी काही महत्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. विशेषत: निर्यातप्रधान उद्योगांसाठी या तरतुदींचा फायदा होणार आहे. स्टार्टअप्ससाठी जवळपास २० कोटी रुपयांचे कर्ज आणि अनुदान देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. 'उद्यम पोर्टल'वर रजिस्टर केलेल्या उद्योगांना त्याचा फायदा होईल. त्याचबरोबर ५० हजार 'अटल टिंकरिंग लॅब्स' उभारल्या जाणार आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ब्रॉडबँड इंटरनेटची सुविधाही देण्यात येणार आहे. याचा फायदा अप्रत्यक्षपणे सगळ्यांना होणार आहे. 'नॅशनल सेंटर फॉर स्किलिंग'च्या पाच केंद्रांमुळे सुमारे पाच कोटी लोकांना फायदा होणार आहे. त्याचबरोबरीने आयआयटीचा होणारा विस्तार विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरू शकतो. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आता सगळीकडे वापरल्या जाणाऱ्या एआय अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्ससाठी 'सेंटर फॉर एक्सेलन्स'ने साठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. परिणामी, पुढच्या सहा ते सात महिन्यांमध्ये भारतात हे ए.आय. मॉडेल येण्याची शक्यता आहे. 'उडान योजने'तंर्गत




छोट्या गावामध्ये एअर कनेक्टिव्हिटी वाढेल. त्यामुळे छोट्या गावांमधील संगणक उद्योगांना नक्कीच चालना मिळेल. इंटरनेट क्षेत्रातील उद्योगांसाठी 'भारत ट्रेड नेट' हा डिजिटल प्लॅटफॉर्मही उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे या प्लॅटफॉर्मचा निर्यातीसाठी फायदा होणार असल्याचेही सांगितले गेले. इलेक्ट्रॉनिक उद्योगांसाठी एलईडी आणि एलसीडी टीव्हीवरील कस्टम ड्युटी कमी करण्यात आली आहे. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादकांना त्याचा फायदा होईल. त्याच बरोबरीने झिंक आणि लीड या खनिजांवरील कस्टम ड्युटीही कमी केल्यामुळे लिथियम बॅटरी उत्पादकांना तसेच इलेक्ट्रॉनिक गाड्यांच्या उत्पादकांनाही फायदा होणार आहे. या सर्वांमध्ये महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बारा लाखांपर्यंतचा आयकर माफ करण्यात आला आहे. त्यामुळे लघु उद्योगांमध्ये काम करणाऱ्यांसाठी ही भेटच समजली जात आहे. परिणामी, बोलक्या तरतुदी, सर्वदूर विचार आणि स्मार्ट योजनांचे प्राबल्य या अर्थसांकल्पामध्ये पहायला मिळत आहे.

■ **दिपक शिकारपूर**

## मध्यमवर्गीयांना दिलासा

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरकारने कनिष्ठ वर्गातील लोकांना विविध वस्तूंवरील कर माफ करण्याची किंवा वस्तू मोफत देण्याची अनेक आश्वासने दिली होती. उच्च वर्गातील लोक स्वत:च्या हिंमतीवर वस्तू खरेदी करू शकतात. तसेच त्यांना विविध सरकारी योजनांचा लाभही घेता येतो. परंतु, मध्यमवर्गीयांना अशा कोणत्याच योजनांचा लाभ मिळत नव्हता. त्यामुळे आपण कररूपाने देत असलेल्या पैशाची सरकार उधळपट्टी करत आहे, असे वाटणे स्वाभाविक होते. परिणामी, या बजेटमध्ये मध्यमवर्गाला दिलासा देणाऱ्या बाबींचा समावेश करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. जसे की, १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नाला आयकर माफ केला जाईल. तसेच ज्येष्ठांना एक लाखांपर्यंतच्या व्याजापर्यंत करकपात होणार नाही, असेही नमूद केले. दरमहा ५० हजार रुपयांपर्यंतच्या घरभाड्यावरही करकपात होणार नाही. अशा छोट्या-मोठ्या बऱ्याच सवलती देण्यात आलेल्या आहेत. मुख्य म्हणजे छोट्या स्वरूपातील चॅरिटेबल ट्रस्टना करमुक्तीसाठी नोंदणी करण्याचा जाचही कमी करण्यात आलेला आहे. थोडक्यात, एकदा नोंदणी झाली की पाच वर्षांऐवजी दहा वर्षांपर्यंत त्यांना करमुक्तीचा लाभ मिळत राहील.

सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे सोपा प्राप्तिकर कायदा. लोकांना समजेल असा प्राप्तिकर कायदा येणे भविष्यात महत्त्वाचे ठरले. जेणेकरून लोक स्वत:च कायद्याचे पालन करू शकतील. यामुळे लोकांचे श्रम आणि वेळ या दोन्हींची बचत होईल. कारण त्यांना कायदा सहजपणे कळेल आणि त्याचे पालन करणे सोपे होईल.

या बजेटमधल्या तरतुदी प्रत्यक्षात अंमलात येतील तेव्हाच त्यांचा फायदा अनुभवता येईल. त्यातली एक बाब म्हणजे वित्तीय तूट कमी दाखवल्यामुळे महागाई वाढण्याची चिन्हे दिसत नाहीत. कारण, वित्तीय तूट असेल तर महागाई वाढण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे वित्तीय तुटीवर ठेवलेले नियंत्रण, ही समाधानकारक बाब आहे.

याआधी अर्थसंकल्पामध्ये लघू किंवा मध्यम वर्गाच्या बाबतीमध्ये पायाभूत सुविधांवर कशा प्रकारे खर्च केला जाईल, यावर भाष्य झाल्याचे दिसून आले. परंतु, ताज्या बजेटमध्ये पायाभूत सुविधांवरील बाबींची मांडणी झालेली दिसत नाही. त्याची मांडणी महत्त्वाची आहे. पायाभूत सुविधांच्या निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराची निर्मिती होत असते. त्या दृष्टीकोनातूनही सरकारने पावले उचलली असतील, अशी आशा आहे. त्याचबरोबरीने सरकारने सौर उर्जेला प्राधान्य देणे, मालाची आयात कमी करणे, पेट्रोलची भाववाढ कमी करणे या आणि अशा अन्य बाबींची दखल घेणे अपेक्षित आहे.

■ **प्रा. मुक्ता पुरंदरे**

# करांमधील बदलांचा करदात्यांना दिलासा




ताजा अर्थसंकल्प एका महत्त्वाच्या टप्प्यावर सादर झाला. आर्थिक सर्वे क्षणाने देशाच्या आर्थिक वाढी, वित्तीय स्थिती आणि धोरणात्मक आव्हानांवर प्रकाश टाकला. निवडणुकांमुळे सतत लोकानुनयी घोषणा आणि मोफत सुविधांचे आश्वासन दिली गेल्यामुळे वित्तीय शिस्तीबाबत चिंता निर्माण झाली आहे. करदात्यांना करसवलती, अनुपालन सुलभीकरण आणि आर्थिक विकासासाठी सुधारणा अपेक्षित आहेत. सरकारसमोर आर्थिक स्थैर्य टिकवण्याचे आणि लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे मोठे आव्हान आहे. त्यादृष्टीने अर्थसंकल्पात वित्तीय जबाबदारी आणि लोककल्याण यामधील समतोल साधणे अत्यंत महत्त्वाचे होते. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जाहीर केले की पुढील आठवड्यात नवीन उत्पन्न करविधेयक सादर केले जाईल. हे विधेयक करदात्यांसाठी सोयीस्कर व्यवस्था निर्माण करण्याच्या सरकारच्या दशकभराच्या प्रयत्नांचे प्रतिबिंब असेल. कर विभागाचा दृष्टिकोन 'प्रथम विश्वास, नंतर तपासणी' यावर आधारित राहील आणि अनुपालन सुलभ करण्यासाठी सरकार वचनबद्ध असेल. हे करदात्यांसाठी सोपे आणि वाद कमी करणारे असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सरकारने पुढील आर्थिक वर्षासाठी ६.३-६.८ टक्के आर्थिक वाढीचा अंदाज वर्तवला. सरकारने 'विकसित भारत २०४७' च्या दृष्टिकोनातून, स्वातंत्र्याच्या शताब्दीकडे वाटचाल करताना, पुढील दशकभर वार्षिक आर्थिक वृद्धी साधण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. नवीन कररचनेत १२ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर आयकर भरावा लागणार नाही. सर्व करदात्यांसाठी स्लॅब आणि दर बदलले आहेत. मध्यमवर्गीयांसाठी कराचा बोजा कमी करून बचत आणि गुंतवणुकीला चालना मिळावी यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. १२.७५ लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या पगारदार करदात्यांसाठी (७५,००० च्या स्टँडर्ड डिडक्शनसह) करआकारणी केली जाणार नाही.

नवीन कर स्लॅब नुसार चार ते आठ लाख रुपयांच्या उत्पन्नावर पाच टक्के कर असणार आहे तर आठ ते बारा लाख रुपयांच्या उत्पन्नावर दहा टक्के कर आकारण्यात येणार आहे. बारा ते सोळा लाख रुपयांच्या उत्पन्नावर १५ टक्के कर आकारण्यात येणार असून सोळा ते वीस लाख रुपयांच्या उत्पन्नावर वीस टक्के कर आकारण्यात येईल. वीस ते चोवीस लाख रुपयांच्या उत्पन्नावर २५ टक्के कर आकारण्यात येणार असून २४ लाखापेक्षा जास्त उत्पन्नावर तीस टक्के कर आकारण्यात येईल. नवीन कर संरचनेमुळे मध्यमवर्गीयांना मोठ्या प्रमाणात करसवलत दिली जात असून करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवली जात आहे. त्यातून घरगुती उपभोग, बचत आणि गुंतवणूक यांनाही चालना देण्यासाठी सुधारित करधोरण आखण्यात आले आहे. सरकारने २०२३ च्या अर्थसंकल्पात नवीन करव्यवस्थेत पन्नास हजारांची स्टँडर्ड वजावट लागू केली होती. ती २०२४ च्या अर्थसंकल्पात वाढवून ७५,००० करण्यात आली. मात्र, जुन्या कर व्यवस्थेत स्टँडर्ड वजावट पन्नास हजार एवढीच आहे. त्यामुळे पगारदार कर्मचाऱ्यांना १२.७५ लाख पर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर भरावा लागत नाही. ताजा अर्थसंकल्प मध्यमवर्गीय करदात्यांसाठी अनेक महत्वपूर्ण बदल घेऊन आला आहे. त्यामुळे त्यांच्याकडे खर्च करण्यायोग्य अधिक रक्कम शिल्लक राहील.

सरकारने कर कारकूनी बोजा कमी करण्यासाठी सुधारणा:

- कर कायद्याचे अपराधीकरण हटवणे हे करदात्यांसाठी स्वागतार्ह ठरेल.
- लहान धर्मादाय संस्थांसाठी नोंदणी कालावधी पाच वर्षांवरून दहा वर्षांपर्यंत वाढवला जाईल. म्हणजेच आता एकदा नोंदणी केलेल्या संस्थांना दहा वर्षांसाठी करमुक्त उत्पन्न मिळणार आहे.
- करदात्यांना दोन स्वयं-अधिवासित मालमत्तांचे वार्षिक मूल्य 'शून्य' म्हणून दर्शवण्याची परवानगी असेल. यासाठी काही अट नाही.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी व्याजावर कर कपातीसाठी मर्यादा ५० हजार रुपयांवरून एक लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली.
- घरभाड्यावरील वजावटीची मर्यादा २.४० लाख वरून ६ लाख करण्यात आली.

सरकारने कर सुलभीकरण आणि आर्थिक स्थैर्यावर भर दिला आहे. नवीन कर कायदा एका आठवड्यात प्रस्तावित झाल्यावर प्राप्तिकर दात्यांसाठी संपूर्ण कर पॅकेज समजून घेता येईल.

■ **चंद्रशेखर चितळे**, सनदी लेखपाल

# थोडा आनंद, थोडी निराशा

निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला ताजा अर्थसंकल्प आकर्षक वाटत असला तरी त्यात घोषणाबाजी अधिक वाटते आहे.निवडणुकीच्या काळात सरकारला साथ देणाऱ्या मध्यमवर्गाचा थोडाफार विचार या अर्थसंकल्पात नक्कीच केला आहे. परंतु एका हाताने द्यायचे आणि दुसऱ्या हाताने काढून घ्यायचे, ही नीती त्याच पद्धतीने पुढे गेली आहे असे वाटायला जागा आहे.

सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे प्राप्तिकरामध्ये सवलती मिळाव्यात, ही अपेक्षा या अर्थसंकल्पाने पूर्ण केली आहे. त्यानुसार त्यांनी बारा लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा केली. करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून केली जात होती. या अर्थसंकल्पात दहा लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होईल, असा अंदाजही व्यक्त केला जात होता. परंतु, अर्थमंत्र्यांनी थेट १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा केली आहे.

वेगळे भांडवली उत्पन्न नसणाऱ्या करदात्यांना बारा लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त असेल. नव्या पद्धतीनुसार कर भरणा करणाऱ्या करदात्याचे उत्पन्न बारा लाख रुपये असल्यास नव्या बदलांमुळे ८० हजार रुपयांचा कर कमी भरावा लागेल. याचा अर्थ, त्याचा शंभर टक्के कर माफ होईल.

सरकारद्वारे दोन प्रकारचे कर संकलित केले जातात. ते प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर म्हणून ओळखले जातात. अप्रत्यक्ष कर हा वस्तू आणि सेवांच्या वापरावर आकारला जाणारा कर आहे आणि तो थेट व्यक्तीच्या उत्पन्नावर आकारला जात नाही. त्यामुळे हा वस्तू आणि सेवा किंमतीसह भरलेला कर आहे. विक्री कर, मनोरंजन कर, उत्पादन शुल्क यासारखे कर वस्तूंच्या विक्रेत्यांवर किंवा सेवा प्रदात्यांवर आकारले जातात. अप्रत्यक्ष कर हा एक कर आहे. तो सामान्यत: इतर व्यक्तीला पारित केला जातो. विक्रेत्यांनी हे कर सरकारला देय करणे आवश्यक आहे. परंतु ते ग्राहकांना वस्तू विकत असल्याने, ग्राहकाला कर भरावा लागेल. अशा प्रकारे ग्राहक विक्रेत्याला कर भरतो आणि विक्रेता तो कर सरकारला देतो.

अर्थसंकल्पातून जीएसटीविषयी काही महत्वाच्या घोषणा केल्या जातील अशा अपेक्षा होत्या. परंतु अर्थमंत्र्यांनी त्याचा काहीही उल्लेख केला केला नाही. काही वस्तूंवरची कस्टम ड्युटी कमी केली गेली आहे. परंतु त्याचा थेट फायदा किती ग्राहकांपर्यंत पोचेल याविषयी शंका वाटते. ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या ठेवींवरील व्याजावरील टीडीएसची मर्यादा वाढवली आहे. ती पन्नास हजार रुपयांवरुन एक लाख रुपये केली आहे. विम्यावरील कर १८ टक्के इतका प्रचंड आहे. प्रत्यक्षात वय वाढते तसे उत्पन्न कमी होते आणि आरोग्य विमाची गरज वाढते. विम्यावरील जीएसटी कमी केला जाणे, अपेक्षित होते. परंतु त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले गेले.

याखेरिज कृषि, संरक्षण, उद्योग या प्रत्येक क्षेत्रात काही तरी केल्याचा देखावा केला आहे, याची जाणीव होते. या घोषणांमधून लोकांपर्यंत नेमके काय पोचेल याविषयी नक्की सांगणे कठीण आहे.

■ **गोविंद पटवर्धन**, कर सल्लागार

# स्वागतार्ह अर्थसंकल्प

**सर्व प्रथम मा.अर्थ मंत्री निर्मला सितारामन यांचे आणि मा.मोदी सरकार यांचे एक चांगला अर्थ संकल्प सादर केल्याबद्दल अभिनंदन!**

मी बरेच वर्षांपासून आयकराची लिमिट १०ते१२ लाख ठेवून मध्यम वर्गीय नागरिकांच्या हातात पैसा खर्च करण्यासाठी उपलब्ध केला पाहिजे जेणे करुन त्यांच्या सर्व अत्यावश्यक गरजा पूर्ण झाल्यानंतरच आयकराचा बोजा त्यांच्यावर टाकणे योग्य होईल. या मताचा मी होतो आणि त्याअनुषंगाने अर्थखात्याशी पत्रव्यवहार देखील केला. त्यामुळे या निर्णयाविषयी आनंद आहे. यामुळे संपत्तीचे विकेंद्रीकरणही होईल व अर्थिक गरीबी आणि श्रीमंती यामधील अंतर कमी होण्यास मदत नक्कीच होईल.

परंतु या आयकरातील सवलती मुळे मध्यमवर्गीयाकडून खर्च होणाऱ्या पैशातील ९०%खरेदी ची कुठेही नोंद होणार नाही. याचाच अर्थ या सर्व पैश्याचे रूपांतर काळ्या पैशात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, त्याचे दुष्परिणाम काय होतात ते सांगण्याची गरज नाही.हे टाळण्यासाठी मी नविन जीएसटी आल्या पासून एक लघुउद्योजक म्हणून अनेक वेळा खालील सुधारणा करण्याची मागणी सरकार दरबारी संघटने मार्फत आणि वैयक्तीक पातळीवर केली आहे.

उपभोक्ता ग्राहकांकडून १८ टक्के दराने जीएसटी वसूल करून सरकारकडे भरण्याची अन्याय कारक आणि तितकीच न पेलवणारा भार लघुउद्योगावर टाकुन त्यांना अनोंदणीकृत व्यवहार करण्यास भाग पाडू नये. त्या साठी विक्रीवर टॅक्स वेगळा न लावता १%दराप्रमाणे आपल्याच विक्रीवर टॅक्स भरण्याची लघुउद्योगावर सक्ती करावी.

लघुउद्योगाची उलाढाल ३कोटी पर्यंत आहे अश्या उद्योगांवरच अशी सक्ती लागू करावी.

त्याचबरोबर जिएसटी नोंदणी २०लाखापासूनच लागू करावी .म्हणजे लघुउद्योगांना आपला व्यवहार करणे अत्यंत सोपे होईल असे लघुउद्योजकांचे आणि माझे मत आहे.

**- मोहन नातू**
माजी उपाध्यक्ष लघुउद्योग भारती

# पर्यटन, महिला, खेळणी उद्योगाला आधार




अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात पर्यटनासाठी तरतूद केली आहे. 'होम स्टे'साठीही आता मुद्रा लोन घेता येणार आहे. पर्यटन क्षेत्र आणि हॉस्पिटॅलिटी सेक्टर (हॉटेल व रेस्तराँ उद्योगाला) अधिक चालना मिळणार आहे. त्याचबरोबर देशात खेळणी उत्पादनांवर भर देण्यात येणार आहे. यामुळे चीनमधून आयात होणाऱ्या खेळण्यांना पर्याय शोधला जात आहे.

भारतात नवीन पन्नास पर्यटनस्थळे विकसीत करण्याची घोषणा निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पातून केली. 'होम स्टे'ला मुद्रा योजनेंतर्गत कर्ज घेता येणार असल्याने छोट्या उद्योगांना हातभार लागणार आहे. तसेच 'होम स्टे'च्या व्यवसायात वाढ होऊ शकते. यातून पर्यटन विकासालाही चालना मिळणार आहे. सीतारमण यांनी 'मेडिकल टुरिजम'ला चालना देण्यासाठीही मोठ्या घोषणा केल्या. खासगी क्षेत्रासोबत भागीदारी करून भारतात वैद्यकीय सेवांसाठी येणाऱ्या पर्यटनाला चालना मिळणार आहे. विदेशात उपचारांसाठी भरपूर खर्च येतो. अशा वेळी विदेशातून लोक भारतात उपचार घेण्यासाठी येतात. प्रादेशिक पर्यटनाला चालना देण्यासाठी नवीन 'उडान' स्कीमअंतर्गत १२० नवी शहरे जोडली जाणार आहेत. या योजनेंतर्गत भारतातील विमानसेवा नसलेल्या शहरांमध्ये विमानतळ बांधण्यात येईल. उडान ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी योजनांपैकी एक आहे. मोदी यांनी यापूर्वी चप्पल घालून विमानात चढताना लोकांना पहायचे आहे, असे म्हटले आहे.

छोट्या कंपन्या आणि 'स्टार्ट अप्स'साठी एक विशेष क्रेडिट कार्ड जारी केले जाईल. त्याची मर्यादा पाच लाख रुपये असेल. पहिल्या वर्षी दहा लाख क्रेडिट कार्ड जारी केली जातील. लघु आणि मध्यम उद्योगातील गुंतवणूक मर्यादा अडीच पटीने वाढेल. 'स्टार्ट अप्स'साठी क्रेडिट गॅरंटी कव्हर वीस कोटी रुपये असेल. खेळण्यांच्या क्षेत्रासाठी एक जागतिक केंद्र निर्माण केले जाईल. कामगार केंद्रित क्षेत्रांसाठी प्रोत्साहन योजना सुरू केली जाईल. चर्मोद्योगासाठी एक विशेष योजना आणली जाईल. पहिल्यांदाच उद्योजकता करणाऱ्या अनुसूचित जातीच्या महिलांना पाच वर्षांसाठी दोन कोटी रुपयांचे मुदत कर्ज दिले जाईल. तरुणांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने अनेक घोषणा केल्या. त्यातीलच एक महत्त्वाची घोषणा म्हणजे देशात आता 'मेड इन इंडिया' खेळणी मिळणार आहेत. खेळण्यांच्या क्षेत्रात राष्ट्रीय योजना आणण्यात येणार आहे. 'स्टार्ट अप'साठी दहा हजार कोटींचे फंड उभारण्याची घोषणा केली आहे. खेळण्याच्या क्षेत्रासाठी भारत 'ग्लोबल हब' बनवण्यात येईल. ही खेळणी 'मेक इन इंडिया'च्या नावाने विकली जातील. खेळणी उद्योगासाठी एक योजना कार्यान्वित करण्यात येईल. या योजनेंतर्गत 'क्लस्टर रुम', 'पॉश लूम' निर्माण करून 'इको सिस्टीम'वर अधिक भर देण्यात येईल. जेणेकरुन चांगल्या गुणवत्तेची, अनोखी आणि पर्यावरणपूरक अशी खेळणी बनवण्यात येतील.

उच्च शिक्षणासाठी भारतीय भाषांमधील पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यात येणार आहे. आपल्या भाषांमधील पुस्तके उपलब्ध असल्यास विद्यार्थ्यांना शिक्षण सोपे जाऊ शकते. त्यासाठी भारतीय भाषांमधील पुस्तकांवर भर दिला जाणार आहे. त्यामुळे यापुढे मेडिकल, इंजिनिअरिंगची पुस्तके मराठीत असतील, असे म्हणायला हरकत नाही. शिक्षणाच्या क्षेत्रात गुणवत्ता वाढवण्यासाठी सरकारने पाच राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्य प्रशिक्षण मिळेल तसेच व्यापक रोजगारसंधीसाठी सक्षम बनवता येईल.

■ **शीला गाढे**

# मिलिटरी डेंटल सेंटरच्या इमारतीचे उद्घाटन



**समाचार/नगर-दि.३**

मिलिटरी डेंटल सेंटर अहमदनगरच्या नवीन अत्याधुनिक इमारतीचे उद्घाटन मेजर जनरल अनुराग विज, जनरल ऑफिसर कमांडिंग, मुख्यालय दक्षिण महाराष्ट्र आणि गुजरात सब एरिया यांच्या हस्ते करण्यात आले.

तज्ज्ञ दंत उपचार प्रदान करण्यात केंद्राची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. आर्मर्ड कॉर्प्स सेंटर आणि स्कूल आणि मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर आणि स्कूलच्या अवलंबित सैन्य आणि त्यांच्या कुटुंबांना. तोंडाच्या आजारांचे लवकर निदान करण्यासाठी आणि रूग्णांना सर्वसमावेशक दंत उपचार प्रदान करण्यासाठी कोन बीम कॉम्प्युटेड टोमोग्राफी (सीबीसीटी) मशीनसह अत्याधुनिक उपकरणांसह दंत सुविधा वाढविण्यात आली आहे.

उद्घाटनाचा दिवस आर्मी डेंटल कॉर्प्सच्या ८४ व्या स्थापना दिनासोबत आला आणि लष्करी चौकीतील विविध मान्यवरांच्या उपस्थितीने त्याचे स्वागत झाले. कमांडिंग ऑफिसर कर्नल विवेक सक्सेना यांनी १९४२ मध्ये पूर्वीच्या भारतातील मुलतान येथे सुरुवातीला उभारण्यात आलेल्या दंत केंद्राच्या ऐतिहासिक पैलूची थोडक्यात माहिती देऊन ऑगस्ट सभेला संबोधित केले आणि त्यानंतर जानेवारी १९४७ मध्ये सध्याच्या ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले. उद्घाटनाचा समारोप अभ्यागत अधिकाऱ्याच्या अभिनंदन संदेशाने झाला.

# तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर रहा- डॉ. सोनवणे

## जागतिक कॅन्सर दिन विशेष





कॅन्सर ऑपरेशन नंतर बाधित भाग काढून टाकल्यानंतर चेहरा, जीभ, तोंड, जबडा अथवा स्तनाची पूर्णबांधनी करता येऊ शकते. यामुळे रुग्ण फक्त आजारातून बरा होत नाही तर त्याला पूर्वीप्रमाणे आत्मविश्वासपूर्वक समाजात वावरताना येते.

वाढती व्यसनाधीनता तरुणाईच्या मुळावर उठली आहे. भारतात गुटखा व तंबाखुजन्य पदार्थांमुळे तरुण पिढीचे भवितव्य धोक्यात आले आहे. अशीच परिस्थिती राहिल्यास आगामी काळात तंबाखूजन्य पदार्थ सेवन करणाऱ्या सुमारे ५० टक्के लोकांना कॅन्सर, हृदयविकार किंवा श्वसनासारख्या गंभीर आजारांना सामोरे जाण्याची भिती कॅन्सरतज्ञ डॉ. सतिश सोनवणे यांनी व्यक्त केली.

जागतिक पातळीवर कॅन्सर विरोधात लढण्यासाठी दरवर्षी देशभरात ४ फेब्रुवारी दिवस जागतिक कर्करोग दिन म्हणून साजरा केला जातो. राज्य सरकारने गुटखाबंदीचा निर्णय घेतला असला तरी अनेक तरुण मावा किंवा तंबाखूजन्य पदार्थांच्या आहारी गेली आहे. भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषदेच्या अहवालातही याबाबत चिंता व्यक्त केली आहे. सध्या तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्या तरुणांवर ज्यावेळी कौटुंबिक जबाबदारी पडेल किंवा त्यांना कर्तबगारी दाखविण्याचे दिवस येतील त्यावेळी २५ टक्के लोकांना या आजारांशी सामना करावा लागू शकतो. त्याचप्रमाणे २५ टक्के लोकांना म्हातारपणापर्यंत या आजारांशी झगडावे लागण्याची शक्यता आहे. अशीच परिस्थिती राहिल्यास भविष्यात तंबाखूजन्य पदार्थ सेवन करणाऱ्या सुमारे ५० टक्के लोकांना कॅन्सर, हृदयविकार किंवा श्वसनासारख्या गंभीर आजारांना सामोरे जाण्याची भीती विविध सर्वेक्षणातून पुढे आली आहे.

कॅन्सर या आजाराबाबत डॉ. सोनवणे म्हणाले, की भारतात तंबाखूजन्य पदार्थांमुळे कॅन्सररुग्णांची संख्या वाढत आहे. वैज्ञानिक प्रगती व नवनवीन उपचार पध्दतींमुळे कॅन्सर असाध्य राहिलेला नाही. वेळीच निदान व कॅन्सरतज्ञांकडून उपचार केले तर तो पुर्णपणे बरा होऊ शकतो. अनेक रुग्णांनी योग्यवेळी तपासणी केल्यामुळे अचूक निदान झाले. व त्यानंतर योग्य उपचार घेतल्यामुळे त्यांनी कॅन्सर आजारावर मात केली आहे. समाजात कॅन्सरआजाराबाबतची नाहक भिती, लाजाळूपना, समाजातील व्यक्तीची प्रतिष्ठा तसेच इतर कारणांमुळे अनेक रुग्ण तपासणी करत नाहीत. आजाराने गंभीर स्वरूप धारण केल्यानंतर रुग्ण शेवटच्या काळात हॉस्पिटलमध्ये भरती होऊन उपचार घेतात. अशावेळी डॉक्टरांनाही रुग्णांवर उपचार करणे अवघड होऊन बसते. परिणामी अनेक रुग्णांना मृत्यूला सामोरे जावे लागते. शरीरीच्या कोणत्याही भागात विशेषतः मान, स्तनांमध्ये अचानक आलेली गाठ, हळू हळू वाढणारी तसेच बरी न होणारी जखम, औषधालाही दाद न देणारा खोकला किंवा आवाजात पडलेला फरक, वारंवार अपचन, गिळण्याचा त्रास किंवा अन्न उलटून पडणे, शरीरावरील तीळ किंवा मस यात अचानक झालेली वाढ, लघवी, शौचाच्या सवयीतील बदल, खोकल्यातून, उलटीतून, लघवीतून, शौचातून अवेळी किंवा अचानक रक्तस्त्राव होणे यासारखी लक्षणे दिसतात. तंबाखू सेवन करणाऱ्यांनी तोंडाची तपासणी करणे गरजेचे आहे. तोंडात तंबाखू ठेवल्या जाणाऱ्या जागेवर पांढरे चट्टे, गुलाबी लालसर रंगाचे चट्टे, तोंडाची लवचिकता कमी होणे, पुर्णपणे तोंड उघडता न येणे तोंडात बऱ्या न होणाऱ्या जखमा होणे यासारखी लक्षणे आढळून येतात. अशा प्रकारच्या आजारात कॅन्सर झालेली गाठ शस्त्रक्रियेद्वारे समूळ काढली जाते. याशिवाय रक्तवाहिन्याद्वारे शरीरात औषधे दिली जाणारी केमोथेरपी, रेडिओथेरपी सारख्या उपचार पध्दती वापरतात. नव्याने झालेल्या संशोधनात योग्यवेळी निदान झाल्यानंतर योग्य उपचार पध्दतींमुळे कॅन्सरवर मात करता येऊ शकते.

**- डॉ. सतीश सोनवणे**
संचालक मॅककेअर हॉस्पिटल, अहिल्यानगर

# जिल्हा नियोजन बैठकीत आ. तांबे यांनी केल्या मागण्या

**समाचार/संगमनेर-दि.३**

आमदार सत्यजित तांबे यांनी जिल्हा नियोजन बैठकीत विविध अहमदनगर येथे झालेल्या बैठकीत केलेल्या प्रमुख मागण्या केल्या. संगमनेर नगरपरिषद हद्दीतील संगमनेर बस स्थानकावर श्री. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा करण्यासाठी दि. १६ नोव्हेंबर २०२३ रोजी तत्कालीन पालकमंत्री मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समवेत झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये ०१ कोटी रु. निधी जाहीर करण्यात आला होता, परंतु मागील ४ महिन्यापासून यावर कुठलीही कार्यवाही झाली नाही म्हणून यावर लवकरात लवकर कार्यवाही करावी व निधी उपलब्ध करून द्यावा.

आश्वी बुद्रुक येथे स्वतंत्र अप्पर तहसील कार्यालयाच्या निर्मितीचा प्रस्ताव मंत्रालयात पोहोचला आहे, परंतु या प्रस्तावात ज्या गावांचा समावेश करण्यात आला आहे, ते पाहता हे विभाजन प्रशासकीय सोयीसाठी नसून राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे स्पष्ट होते. संगमनेर शहराच्या अगदी जवळ असलेली गावे



देखील संगमनेर तहसील कार्यालयापासून वेगळी करण्यात येणार आहेत, यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास होणार आहे. प्रशासन जर राजकीय दबावाखाली येऊन हा निर्णय घेत असेल तर हे चुकीचे आहे. त्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी.

अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व शहरांमधील सीसीटीव्ही कॅमेरांची देखभाल व दुरुस्ती ही पोलिसांमार्फत झाली पाहिजे. स्थानिक नगरपालिका यांच्याकडे त्यासाठी कुठलाही अतिरिक्त निधी नाही त्यामुळे पोलिसांनी त्यासाठी निधीची तरतूद करावी. याबाबत पालकमंत्री महोदयांनी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना त्याबाबतचे आदेश दिले. संगमनेर तालुक्यातील मालदाड येथील श्री क्षेत्र चैतन्य मच्छिंद्रनाथ मठ देवस्थान, आश्वी बु. येथील श्री. चैतन्य महाराज देवस्थान, खळी येथील श्री. खंडोबा महाराज देवस्थान व निळवंडे येथील श्री. दत्त महाराज देवस्थान चैतन्य कानिफनाथ (शिवगिरी महाराज समाधी) या ४ तीर्थक्षेत्रांना क वर्गाचा दर्जा मंजूर करणे. संगमनेर तालुक्यातील चिखली येथील स्मशानभूमी विकसित करण्यासाठीचे काम २६ जून २०२३ सुरू झाले त्यानंतर दोन महिन्यात ते पूर्णही झाले. परंतु त्या कामाचे च.इ. ठशलीव अजूनही झालेले नाही तसेच संबंधित कॉन्ट्रॅक्टरांना कामाचे पैसे मिळालेले नाही. त्यामुळे या प्रकरणात तातडीने लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी केली. तसेच इतर प्रमुख मागण्यांचा समावेश होता.

# पाणी पुरवठ्याबाबत खोटी माहिती पसरवल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**समाचार/नगर-दि.३**

महापालिकेच्या पाणी पुरवठ्याबाबत खोट्या माहिती पसरवल्याप्रकरणी एकाविरोधात महापालिकेने गुन्हा दाखल केला आहे. पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख परिमल निकम यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अल्तमश जरीवाला (रा.नगर) यांच्या विरोधात तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जल अभियंता निकम यांना त्यांच्या व्हॉट्सपवर महापालिकेतर्फे सर्वांना विनंती आहे की, पाणी गरम करून प्यावे. जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर मशीन बिघाड झाल्याने येत्या ३ किंवा ४ दिवसात कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे महापालिकेतर्फे पाणी फिल्टर न करता सोडण्यात येणार आहे. कृपया ही माहिती आपल्या सर्व मित्र परिवाराला कळवावी आणि आपण पण काळजी घ्यावी. अशा आशयाचे पत्रक असलेला मेसेज आला. अशी खोटी माहिती पसरवून महापालिकेची बदनामी केल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे. नागरिकांनी महापालिकेबाबत अशा प्रकारची माहिती प्रसारित करण्यापूर्वी, पोस्ट व्हायरल करण्यापूर्वी खात्री करावी, खोटी माहिती पसरवून नागरिकांमध्ये दिशाभूल करू नये, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



# श्याम नळकांडे यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना दिले रक्ताने रेखाटलेले चित्र

**समाचार/नगर-दि.३**

नगसेवक शाम नळकांडे यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे यांना हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघे यांचे रक्ताने रेखाटलेले चित्र देण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, संपर्क प्रमुख दिलीप सातपुते, शहरप्रमुख सचिन जाधव, संभाजी कदम, बाबुशेठ टायरवाले, संजय शेंडगे, गणेश कवडे, सचिन शिंदे, बाळासाहेब बोराटे, दत्ता कावरे, परेश लोखंडे, संतोष गेन्नप्पा,संदिप दातरंगे आदि उपस्थित होते.

हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघ यांचे चित्र गणेश जिंदम यांनी रेखाटले आहे. त्यांना हे चित्र रेखाटण्यासाठी ३ तास लागले. त्यांनी या अगोदर ही शिवसेना प्रमुख बाळसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने रक्ताने चित्र रेखाटले होते. त्यावेळी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना मुंबईला बोलावून त्यांचे कौतूक केले होते.

# रामदेवबाबा जम्मा जागरण कार्यक्रम उत्साहात

**समाचार/नगर-दि.३**

येथील सकल राजस्थानी युवा मंच (ट्रस्ट) एवम् महिला मंचने माघ सुदी बीजे निमित्त बुरुडगाव रोडवरील आर्यन लॉनमध्ये आयोजित केलेला श्री रामदेवबाबाजी यांचा विशाल जम्मा जागरण व भजन संध्येचा कार्यक्रम उत्साहात आणि भक्तिपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

विश्वविख्यात जम्मा गायक सुशिलजी गोपालजी बजाज (हैदराबाद) यांच्या सुमधुर वाणीतील भक्तीगीतांनी वातावरण भारावून टाकले. अत्यंत ठेक्यात गायिली गेलेली भक्तिगीते भाविकांना भान हरपून टाकावयास लावणारी ठरली. श्रीरामदेवजी बाबांच्या जीवनचरित्रावरील भजने आणि प्रेरणादायी कथा मंत्रमुग्ध करणाऱ्या ठरल्या. या सोहळ्यात गुरूदेव



अशोकजी मुथा बापजी यांची प्रमुख उपस्थिती लाभली, अशी माहिती धनेश कोठारी यांनी दिली.

श्रीरामदेव बाबाजी यांची भक्त मंडळी नगरमध्ये मोठ्या संख्येने आहे. श्री रामदेव भक्त मंडळ ट्रस्ट तर्फे शहरात वेळोवेळी धार्मिक कार्यक्रम घेण्यात येतात. ट्रस्टच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या जम्मा जागरण कार्यक्रमास शहरासह उपनगरातील स्त्री पुरूष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गौतम प्रसादीची व्यवस्था छायाबाई गणेशलाल कोठारी एवम् कोठारी परिवार तसेच

स्व. सरलाबाई बाबुलालजी पिपाडा यांच्या स्मरणार्थ पिपाडा परिवार व श्रीमती लताबाई धनंजय चोरडिया यांनी केली. प्रमुख सहयोगी स्व. वसंतलाल रसिकलाल बोरा परिवार होता. मंडप व्यवस्था स्व. चंद्रकांत पन्नालाल मुथा परिवाराने केली. कार्यक्रमास अजय बोरा (व्हीआरबी ज्वेलर्स), अविनाश मुथा (मुथा डेकोरेटर्स ) व संतोष गुगळे ( अन्नपूर्णा केटरर्स) याचे विशेष सहकार्य लाभले.हा कार्यक्रम नगरकर भाविकांसाठी अध्यात्मिक पर्वणीच ठरला. प्रत्येक गीतावर उपस्थितांनी ठेका धरत सहभाग घेतला.

## ४१ संघांचा सहभाग; मान्यवरांची उपस्थिती

# 'समर्थ' मध्ये सूर्यनमस्कार स्पर्धा उत्साहात

**समाचार/नगर-दि.३**

येथील श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ अहिल्यानगर या शैक्षणिक संस्थेने दासनवमी उत्सवानिमित्त सालाबादप्रमाणे सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला येथे भव्य सूर्यनमस्कार स्पर्धा आयोजित केल्या होत्या या स्पर्धेत शहरातून जवळपास ४१ संघानी सक्रीय सहभाग घेतला होता. या स्पर्धा अतिशय उत्साही वातावरणामध्ये पार पडल्या.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर, शालेय समिती चेअरमन अँड किशोर देशपांडे, सांगळेगल्ली माध्य विभागाचे शालेय समिती चेअरमन



स्वप्निल कुलकर्णी, दासनवमी उत्सव प्रमुख व मंडळाचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, कार्यकरिणी सदस्या संध्या कुलकर्णी, सांगळेगल्ली माध्य विभागाचे मुख्याध्यापिका वसुधा जोशी, सावेडी प्राथ विभागाचे सौ. धनश्री गुंफेकर , सांगळेगल्ली प्राथ विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन, पर्यवेक्षक सुनिल कानडे आदी मान्यवर उपस्थित होते. श्रीपाद कुलकर्णी म्हणाले सूर्यनमस्कारात सर्व आसनाचा समावेश असल्याने हे आसने सर्वानी नियमित करावीत रोगमुक्त, तणावमुक्त, राहण्यासाठी समृध्दी व शांतता आणण्यासाठी सकाळी व संध्याकाळी एक तास योगासाठी देणे आवश्यक आहे. सूर्यनमस्कार हा सर्वांग सुंदर व्यायाम आहे. श्री समर्थ रामदास स्वामीनी आयुष्यभर सूर्यनमस्कार घालत बलोपासना केली श्री समर्थ रामदास स्वामी हे भारत व महाराष्ट्रातील एक संत जे बलोपासना करत होते. शक्तीची उपासना करणारे संत श्री समर्थ रामदास स्वामी होते सूर्यनमस्काराचे फायदे व बलोपासनेचे महत्व त्यांनी यावेळी सांगितले, या सर्व स्पर्धे चे परिक्षण सावेडी येथील योग विद्याधाम समितीचे माणिक आडाणे, त्यांचे २५ सहकारी बंधू भगिनी केले. या संघासोबत अनेक शाळेचे मागदशक उपस्थित होते. समवेत संघाना मोहिनी कुलकर्णी, ज्योति कोहकडे यांनी मार्गदशन केले. सुत्रसंचालन संकेत शिंदे यांनी केले. आभार क्रिडा विभागप्रमुख पोपट लोंढे यांनी मानले.

# शिक्षक भारती संघटनेतर्फे शिक्षकांच्या प्रश्नी निवेदन

**समाचार/नगर-दि.३**

अहिल्या नगर जिल्ह्यातील शिक्षक शिक्षकेतरांचे अनेक वर्षांपासून विविध मागण्या प्रलंबित आहेत . शिक्षकांचे विविध समस्या समजून घेऊन आता लवकरात लवकर ही समस्या सोडविण्यात यावे, या मागणीसाठी अहिल्यानगर जिल्हा शिक्षक भारती संघटनेच्या वतीने वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांना जिल्हयातील माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी निवेदन देण्यात आल्याची माहिती शिक्षक भारतीचे राज्य सचिव तथा शिक्षक नेते सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप



यांनी सांगितले. या निवेदनात वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी पात्र शिक्षकांचे वेतन श्रेणी प्रस्ताव तातडीने मंजुर व्हावेत., टप्पा अनुदानावरील शाळांना अनुदान मंजुर करावे., प्रलंबित थकीत देयके व वैदयकिय देयके त्वरीत मंजुर करावीत., डि.एड ते बी. एड व ये एम ते बी. एड प्रमोशन प्राप्त शिक्षकांना प्रमोशन मिळावे.,माध्यमिक शिक्षकांवर लादण्यात आलेल्या अशैक्षणिक कामांचा भार कमी करण्यात यावा. (उदा.-बी. एल.ओ).,विनाअनुदानित शाळेतुन अनुदानित शाळेत बदलीस मान्यता दयावी., जुनी पेन्शन योजना लागु करावी या मागणीसाठी शासनदरबारी पाठपुरावा करावा., अतिरिक्त ठरलेल्या पदांचे समायोजन करावे., वेतनेतर अनुदानाचा प्रश्न. मार्गी लावावा., प्रोव्हिडंड फंडांच्या पावत्या कर्मचा-यांना मिळाव्यात., असेही शिक्षक भारती संघटनेचे राज्य सचिव तथा शिक्षक नेते सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप व इतर पदाधिकाऱ्यांनी मागणी केली.



# सहजयोग केल्यास कौटुंबिक कलह दूर होतील- डॉ. निघुते

**समाचार/नगर-दि.३**

भिंगार येथील माजी सैनिकांनी एकत्र येऊन सुरु केलेल्या माजी सैनिक बहुउद्देशीय संस्थेचे वतीने शहीद स्मारक, सत्यभामा मंगल कार्यालय, शांती नगर, भिंगार येथे हळदी कुंकू कार्यक्रमाचे नियोजन केले होते, या कार्यक्रमांस प्रमुख पाहुणे संगमनेर येथील प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ व लोटस इंग्लिश मेडीयम स्कुल चे संस्थापिक निलिमा निघुते, आ. शिवाजी कर्डीले यांच्या पत्नी सौ. अलकाताई कर्डीले, नगरसेविका वीणा बोज्ञा, संगीता केदार, रूट्स प्री स्कुलचे संचलिका अपेक्षा परदेशी आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.या वेळी हळदी कुंकू निमित्त प. पु. माताजी श्री निर्मला देवी प्रणित सहजयोग परिवाराच्या वतीने आलेल्या महिलांना कुंडलिनी शक्ती जागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला.


डॉ. निघूते म्हणाले सहजयोग हा अत्यंत सोपा योग असून प्रत्येकाला एकत्रित बसून सहकुटुंब करता येणारा योग आहे. या योगामध्ये कोणताही जातीधर्म नसून महिलांनी हा योग आत्मसात केल्यास घरातील इडा पीडा टळतील, घरातील दोष दूर होऊन कुटुंबामध्ये सुख शांती समाधान लाभेल, कौटुंबिक कलह दूर होतील यासाठी महिलांनी सहजयोग आत्मसात करावा. अल्का कर्डीले म्हणाल्या की या भागात मोठया प्रमाणात कुटुंबाचा राहिवास असून महिलांची मोठी एकी या गर्दी वरून दिसून येते, नक्कीच भविष्यात तुम्हांला कोणत्याही गोष्टीची गरज असेल तर आम्ही सहकार्य करू.

## सुरेश वाबळे; शिर्डीत ८,९ फेब्रुवारीला होणार परिषद

# सहकार परिषद पतसंस्था चळवळीला दिशादर्शक

**समाचार/नगर-दि.३**

राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने शिर्डी येथे ८ व ९ फेब्रुवारी रोजी दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशन सहभगी होणार आहे. पतसंस्था चळवळीला नवी दिशा व गती, बळकटी मिळावी तसेच पतसंस्थांवरील विश्वास अधिक दृढ व्हावा या उद्देशाने राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांच्या नेतृत्वाखाली या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचे आयोजन केले आहे. या सहकार परिषदेमध्ये भारतासह आठ देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. त्यामुळे



प्रदेशात आर्थीक क्षेत्रात चालू असलेले कार्याची माहिती या परिषदेमध्ये मिळणार आहे. त्यामुळे या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेमध्ये राज्यातील सर्व मल्टीस्टेट पतसंस्था सहभागी होणार असून सर्व पतसंस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने दोन दिवस शिर्डी येथे उपस्थित राहणार आहेत.

जिल्ह्यातील सर्व मल्टीस्टेट पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांनीही आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेसाठी नोंदणी करून उपस्थित राहून ही सहकार परिषद यशस्वी करावी, असे आवाहन मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांनी केले.

दि. ९ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेच्या नियोजनासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील मल्टीस्टेट पतसंस्थांच्या झालेल्या बैठकीत सुरेश वाबळे बोलत होते. यावेळी जिल्ह्यातील मल्टीस्टेट पतसंस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी स्थैर्यनिधी महासंघाचे उपाध्यक्ष वसंत लोढा यांनी उपस्थितांना आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेची माहिती देऊन या सहकारी परिषदेमध्ये राज्यातील सहकरी व मल्टीस्टेट पतसंस्थांची एकजूट दिसणार आहे, असे सांगितले. प्रास्ताविक मल्टीस्टेट फेडरेशनचे संचालक कडुभाऊ काळे यांनी केले तर आभार संचाकाल आजिनाथ हजारे यांनी मानले. यावेळी मल्टीस्टेट फेडरेशनचे संचालक ज्ञानेश्वर पाचपुते, राजेंद्र नलगे, शिवाजीराव बनकर, नमिता ठुबे, नकुल कडू, उत्तमराव औताडे, रमेश जाधव, मंगेश देहाडकर, स्वप्निल झावरे व जिल्ह्यातील मल्टीस्टेट संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नगरच्या ५० महिलांचा पठणात समावेश

# श्रीकृष्ण तांडवच्या पठणाने दुमदुमली त्रिपुनीथुरा नगरी

**समाचार/नगर-दि.०३**

एचएफ डी म्हणजेच फाउंडेशन फॉर हॉलिस्टिक डेव्हलपमेंट या फाउंडेशनच्या २०20 सालापासून सुरू असलेल्या तांडव पठण पाचवे तांडव पुष्प पूर्णत्रिशा मंदिर त्रिपुनी थुरा कोची केरळ येथे सादर करण्यात आले आणि श्रीकृष्ण तांडवच्या पठणाने सारी त्रिपुनी थुरा नगरी दुमदुमली.

या श्रीकृष्ण तांडव पठणात भारतभरातील सुमारे १000 महिलांचा समावेश होता यापैकी जवळजवळ ५0 महिला अहिल्यानगरीच्या रहिवासी आहेत.

श्रीकृष्ण पठणासाठी सूर्योदयाचा मुहूर्त ठरलेला होता २३ जानेवारीला पूर्णत्रयीशा त्रिपूनिथुरा मंदिरात पहाटेच लगबग सुरू झाली पांढरी केरळी साडी शेला घेतलेल्या मातृशक्ती मंडळाच्या सर्व महिला व मंदिरातला सारा परिसर प्राजक्ताच्या फुलांचा सडा पडल्यासारखा वाटत होता




स्थानिक रहिवासी व फाउंडेशनच्या मातृ शक्तींनी मिळून देवळाच्या चारीही भिंतीतले ६000 दिवे प्रज्वलित केले मंदिराचा सारा परिसर उजळून निघाला.

अतिशय आस्थेने आणि भारावलेल्या मनाने फाउंडेशनच्या सदस्य मेंबर महिला हातात तुपाचे दिवे व फुले घेऊन सूर्योदय मुहूर्ताची वाट पहात अगदी शिस्त बद्ध पद्धतीने उभ्या होत्या. भारतीय संस्कृती वारसा जपणाऱ्या फाउंडेशनच्या या मातृशक्तीला पाठिंबा देण्यासाठी स्थानिक लोकांनी ही गर्दी केली होती सूर्योदयाच्या मुहूर्तावर श्रीकृष्ण तांडव चे समूह पठण करण्यात आले आणि सारी त्रिपुनीथुरा नगरी दुमदुमली तसेच

एम आय टी एस मधील विद्यार्थ्यांना तसेच युवा पिढीला श्रीकृष्ण तांडव पठणाचा लाभ देण्यात आला. मातृशक्तीच्या तांडव मध्ये भाग घेण्याचे आव्हान करण्यात आले. एवढ्या मातृशक्ती ना एकत्र आणून समाजात एकोपा आणि सकारात्मतेची ऊर्जा निर्माण करण्याचा हेतू साध्य होताना दिसत होता यासाठी कार्यक्रमाच्या सर्वेसर्वा माधुरीताई सहस्त्रबुद्धे आणि त्यांच्या टीमने वर्षभर अथक परिश्रम केले

यासाठी नगर हून अवंती दीक्षित यांनी परिश्रम घेतले. यापुढील तीन तांडव होणार आहेत. पुढील तांडव चे रजिस्ट्रेशन गुढीपाडव्याला होणार आहे, यासाठी गायत्री मोहळे ९४२०८१४६३५ व स्वाती कुलकर्णी ९0%५३८८९२५ व ९८२२४%00%४ रजिस्ट्रेशन साठी संपर्क साधावा.


**घर विकणे आहे**

गुलमोहर रोड, सावेडी येथे दोन मजली ६ रूम, २ किचन, २ संडास-बाथरूम, २ बाल्कनी किंमत ५१ लाखांत अर्जंट विकणे आहे

9890103648
7768003126

**विकणे आहे**

१) ऑफिससाठी/दुकानासाठी उपयुक्त पार्टीशन साईज 9X6.5' आणि 7X7.25'
२) ऑफिस टेबल - 4.7'X2.4'
३) ऑफिस टेबल - 3'X2'

मो. नं. 9860046338

ब्रॅण्डेड व एक्सक्लुझिव्ह किचन शो-रूम करीता

**त्वरीत पाहिजेत**

**3D डिझाईनर Female - (जागा २)**
Auto Cad / Sketchup / 3D Max इ. सॉफ्टवेअरचे ज्ञान आवश्यक, किमान १ ते २ वर्षाचा अनुभव आवश्यक. (जागा १)

**सेल्स एक्झिक्युटीव्ह - (जागा २)**
पद्वीधर / एमबीए, उत्तम संभाषण कौशल्य, किमान १ ते २ वर्षाचा अनुभव आवश्यक. (जागा १)

**हेल्पर - (जागा २)**
किचन ट्रॉली फिटींग करीता, अनुभव असल्यास प्राधान्य.

सर्व उमेद्वारांसाठी वयोमर्यादा : २० ते ३५

स्वहस्ताक्षरातील अर्जासह समक्ष भेटा वेळ - सकाळी ११ ते २ व सायं. ५ ते ७ (रविवार बंद)

ओस्तवाल किचन्स Har Ghar Ke Liye...
१, सिटी सेंटर कॉम्प्लेक्स, मिस्कीनमळा, तारकपूर-गंगा उद्यान रोड, सावेडी, अहमदनगर

GALAXY




# जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय उपाध्यपदी सतीश लोढा

**समाचार/नगर-दि.०३**

जैन समाजाची देशपातळीवरील सर्वोच संघटना असलेल्या नवी दिल्ली स्थित अखिल भारतीय जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी नगर येथील मर्चटस व्यापारी सतीश (बाबूशेठ) नारायणदास लोढा यांची निवड झाली.

संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अतुल जैन, महामंत्री अमित राय यांनी लोढा यांच्या नियुक्तीची घोषणा केली. माजी राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश चोरडिया, पारस मोदी यांच्या मार्गदर्शनाने ही निवड करण्यात आली आहे. सतीश लोढा हे अहिल्यानगर जैन श्रावक संघ, धार्मिक परीक्षा बोर्ड, जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल, महावीर नगर श्रावक संघात अनेक वर्षांपासून सक्रीय योगदान देत आहेत. सामाजिक, धार्मिक, आरोग्य, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात ते सक्रिय आहेत. साधू साध्वीजींच्या सेवेत ते नेहमी अग्रेसर असतात.

या निवडीबद्दल बोलताना सतीश लोढा म्हणाले की, जैन कॉन्फरन्स ही राष्ट्रीय पातळीवरील जैन समाजाची शिखर संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून देशाच्या कानाकोपऱ्यातील जैन समाज बांधवांसाठी काम केले जाते. या प्रतिष्ठित संस्थेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी झालेली निवड आनंददायी आहे. पदाच्या माध्यमातून समाजासाठी भरीव कार्य करण्याचा प्रयत्न राहील. या निवडीबद्दल लोढा यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय मंत्रीपदी वसंत लोढा

**समाचार/नगर-दि.०३**

जैन समाजाच्या देश पातळीवरील सर्वोच्च शिखर असलेल्या नवी दिल्ली येथील अखिल भारतीय श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीयमंत्रीपदी दीनदयाळ परिवाराचे संस्थापक तथा भाजपचे जेष्ठ नेते वसंत लोढा यांची निवड करण्यात आली आहे.

नवी दिल्ली येथे शनिवारी अखिल भारतीय श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स च्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्ष अतुल जैन यांनी वसंत लोढा यांची राष्ट्रीय मंत्री पदी नियुक्ती जाहीर केली.

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा यांचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय ,धार्मिक, सांस्कृतिक,कला सर्वच क्षेत्रातील अमूल्य योगदानाबद्दल त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय मंत्रिपदी निवड करण्यात आलेली आहे.

वसंत लोढा यांची निवड झाल्यानंतर परमपूज्य आदर्शऋषीजी महाराज साहेब यांनी आशीर्वाद दिले. तर या निवडीबद्दल जैन समाजाच्या वतीने पूर्व राष्ट्रीय अध्यक्ष पारस मोदी,अविनाश चोरडिया,हस्तीमल मुनोत,जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा,जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य तसेच महाराष्ट्र राज्याचे विधानसभेचे सभापती प्रा.राम शिंदे,भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर आदींनी अभिनंदन केले आहे.


मरणोत्तर नेत्रदानाची वाट, अंध जीवनाची चैतन्यमय पहाट...



“मरणोत्तर नेत्रदान करूया, दोन अंधाचे अंध:कारमय जीवन प्रकाशमान करूया..”

स्व.श्रीमती बदामबाई आसराजजी कटारिया

कटारिया परिवाराच्या योगदानाबद्दल शतशः ऋणी आहोत.

डॉ. कांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
मान कन्हैया नेत्रपेढी

वर्धमान, माणिकचौक, अहमदनगर 414001
संपर्क मोबा.: 8888982222 / 9112288611



।। उत्कट भव्य तेचि घ्यावे ।।

**श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, अहिल्यानगर**
भिस्तबाग रोड, प्रोफेसर कॉलनीजवळ, अहिल्यानगर ४१४००३
फोन : ०२४१-२३२७३७९, २४२३०४१, २४११५७६, २३४७३२०, २४२९६३०


श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, अहिल्यानगर संचालित
बालवाडी वर्ग (लहान गट व मोठा गट)
शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी प्रवेश देणे बाबत सूचना
१) श्री समर्थ विद्या मंदिर, सांगळे गल्ली, अहिल्यानगरचा
बालवाडी वर्ग (लहान गट व मोठा गट), सांगळे गल्ली
२) श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, सावेडी, अहिल्यानगरचा
बालवाडी वर्ग (लहान गट व मोठा गट), सावेडी.

## प्रवेशाबाबत पालकांसाठी महत्वाच्या सूचना

| अ. क्र. | प्रवेशाचा वर्ग | वयोमर्यादा | दि. ३१/१२/२०२५ पर्यंत किमान वय |
|---|---|---|---|
| १. | लहान गट | दि. ०१/१०/२०२० ते दि. ३१/१२/२०२१ या कालावधीत पाल्याचा जन्म झालेला असावा. | ४ वर्षे |
| २. | मोठा गट | दि. ०१/१०/२०१९ ते दि. ३१/१२/२०२० या कालावधीत पाल्याचा जन्म झालेला असावा. | ५ वर्षे |

१) पालकांनी बालवाडी वर्ग (लहान गट व मोठा गट) प्रवेशासाठी संस्थेचा छापील छाननी अर्ज सादर करावा. सांगळे गल्ली विभागात शनिवार, दि. ०८/०२/२०२५ ते शनिवार दि. १५/०२/२०२५ अखेर सकाळी ९ ते १०.३० या वेळेत छाननी अर्ज विक्री सुरू राहील. **तर सावेडी विभागात याच कालावधीमध्ये दुपारी १.३० ते ३.०० या वेळेत छाननी अर्ज विक्री सुरु राहील.**
२) सांगळेगल्ली विभागात पालकांनी पूर्ण भरलेले छाननी अर्ज शाळेकडे सोमवार, दि. १०/०२/२०२५ ते सोमवार, दि. १७/०२/२०२५ अखेर सकाळी ९ ते १०.३० या वेळेत जमा करावेत. (रविवारी छाननी अर्ज विक्री व भरलेले छाननी अर्ज स्वीकारण्यास सुट्टी राहील.) **तर सावेडी विभागात याच कालावधीमध्ये दुपारी १.३० ते ३.०० या वेळेत छाननी अर्ज विक्री सुरु राहील.**
३) अर्जासोबत पाल्याच्या जन्म तारखेच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत व आधार कार्डची प्रत जोडणे आवश्यक आहे.
४) मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत पालकांच्या जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.
५) प्रवेश संख्येच्या उपलब्धतेनुसार प्रवेश देण्यात येतील.

स्थळ : अहिल्यानगर
दिनांक : ०३/०२/२०२५

**सुरेश अच्युत क्षीरसागर प्रभाकर सखाराम ओहोळ**
**सेक्रेटरीज्**
श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, अहिल्यानगर.


शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकामाची रांगोळी

डागा
**शांतीलाल डागा**
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०

आपल्या उज्वल भविष्यासाठी आजच गुंतवणूक करा
व्ही गार्डचा सोलार वॉटर हिटर घेऊन या..
वीज बिलात बचत करून आपले भविष्य सुरक्षित करा...
देशात सर्वाधिक विक्री होणारे व्ही गार्ड सोलार वॉटर हिटर

Evacuated Tube Collector
V-GUARD
Solar Water Heater
- अधिकृत विक्रेते -
प्रोप्रा. मिलिंद गंधे

SS 304 L टँक
उत्तम दर्जाचे PUF इन्शुलेशन
60 LS 5000 LPD
उपलब्ध प्रेशराइज्ड मॉडेल्स उपलब्ध



आदित्य एन्टरप्रायजेस्
गुलमोहोर रोड, सावेडी, अ. नगर.
9325103781




जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
**आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर**
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर - ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com

N.A.B.H. (Full Accredited) & ISO 9001:2015 Hospital

**छातीविकार व ॲलर्जीसाठी मोफत तपासणी शिबीर**

गुरुवार - दि. ०६-०२-२०२५ * वेळ : सकाळी १० ते २

फुफ्फुसाचे सर्व आजार, झोपे संबंधीचे सर्व विकार, ॲलर्जी विकार, दमा, न्युमोनिया, न थांबणारा खोकला ही लक्षणे असणाऱ्या रुग्णांसाठी मोफत तपासणी व उपचार.



तज्ञ डॉक्टर
रुबी हॉल व लोपमुद्रा हॉस्पिटल पुणे येथील प्रतिथयश व निष्णांत फुफ्फुस विकार तज्ञ
**डॉ. स्नेहा तिरपुडे**
MBBS, MD (Pulmonary Medicine), DNB (Pulmonary Medicine)
Asthma Allergy Fellowship, King's College, London (UK)

हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.

24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक

| डिजिटल एक्सर | सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह | सिटीस्कन | एम.आर.आय. |
|---|---|---|---|
| रू. 250/- | रू. 800/- | रू. 1250/- | रू. 2500/- |


### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,
मिळकतीचे वर्णन:-
डि. अहमदनगर, सब डिव्हिजन व तालुके नगर पैकी, अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर यांच्या हद्दीतील मौजे नालेगाव येथील शेतजमीन मिळकत गट नंबर २७०/२ याचे एकूण क्षेत्र ० हे ११ आर येणेप्रमाणे जमीन मिळकत यातील वागणुकीचे व वहिवाटीचे सर्व हक्कासहीत काहीही एक राखून न ठेविता.

वर नमूद केलेली मिळकत ही दत्तात्रय धोंडीराम पाठक यांच्या मालकीची वहिवाटीची अशी मिळकत आहे. दत्तात्रय धोंडीराम पाठक यांनी त्यांचे हयातीत सदर मिळकतीबाबत अवधूत तुळशीराम पाठक यांचे बरोबर करारनामा/उसनवार पावतीचा दस्त दिनांक १५/०१/२०१९ रोजी केलेला आहे. त्या करारनाम्याने दत्तात्रय धोंडीराम पाठक यांनी अवधूत तुळशीराम पाठक यांच्याकडून रक्कम रुपये २,५०,०००/- स्वीकारुन सदरची मिळकत ताब्यात दिलेली आहे. जोपर्यंत पैसे परत देत नाही तोपर्यंत सदर मिळकतीचा ताबा हा अवधूत तुळशीराम पाठक यांच्याकडेच राहिल असे मान्य केलेले आहे. तेव्हापासून सदरची मिळकत ही अवधुत तुळशिराम पाठक यांचेच ताब्यात होती. दरम्यान अवधूत तुळशीराम पाठक हे तारीख १४/०८/२०२० रोजी मयत झाले असून त्यांचे वारस या नात्याने सदरची मिळकत सदर करारनाम्याने आमचे अशिल जयश्री अवधूत पाठक व अलीशा अवधूत पाठक यांच्याच ताब्यात आहे. दरम्यान दत्तात्रय धोंडीराम पाठक हे देखील मयत झाले असून त्यांचे वारसांना वरील व्यवहाराबाबत माहिती असतानाही ते सदर मिळकतीचे हस्तांतर करु पहात असल्याची खात्रीशीर माहिती आमचे अशिलांना मिळालेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सबब वरील मिळकतीबाबत दत्तात्रय धोंडीराम पाठक यांचे वारसाबरोबर कोणीही कसल्याही प्रकारे खरेदी, विक्री, गहाण, दान अगर हस्तांतरणाचा कोणताही व्यवहार करु नये, याउपर जर कोणीही कसल्याही प्रकारचे व्यवहार केले तर ते आमचे अशिलांवर व वरील मिळकतीवर मुळीच बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. ताबा आमचे अशिलाकडेच असल्याने ताबा मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

तारीख ०१/०२/२०२५

**ॲड. आर.बी.खंडेलवाल**
बी.एस्सी.एल.एल.बी.
अमेय चेंबर्स, जिल्हा न्यायालयाजवळ, अहमदनगर
मो.नं.९८२२८१६८९०





Milk & Cream Icecream Product
HATSUN Daily
प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दि.३१/०१/२०२५ ते दि.०६/०२/२०२५



**DEVA (हिंदी)**
07.45 AM 09.15 AM 10.45 AM 01.45 PM 02.30 PM 04.45 PM 07.45 PM 10.45 PM

**SKY FORCE (हिंदी)**
09.30 AM 12.00 PM 05.30 PM 08.00 PM 10.30 PM

**ILU ILU 1998 (हिंदी)**
04.15 PM

**मुक्काम पोस्ट देवाचं घर (मराठी)**
02.00 PM

**JOURNEY (हिंदी)**
12.15 PM

**फसक्लास दाभाडे (मराठी)**
06.30 PM

**PUSHPA RELOAD**
09.30 PM

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show
CONNPLEX
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002